



पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक २१६ ■ गुरूवार, दि. १२ फेब्रुवारी २०२६ ■ मुल्य ३ रुपये ■ पृष्ठे ६

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com





# सावधान, पांढऱ्या सोन्याची काळी कहाणी !

## कापूस उत्पादक शेतकरी संकटात, अमेरिका-बांग्लादेश करार चर्चेत...

प्रतिनिधी १२ फेब्रुवारी



**मुंबई / अकोला:** वऱ्हाडातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांसाठी ही बातमी धक्कादायक आहे. एकीकडे भारतात कापसाला योग्य भाव मिळत नसल्याने कापूस उत्पादक आर्थिक संकटात आहे. त्यातच अमेरिका आणि बांग्लादेश यांच्यात वस्त्रोद्योग क्षेत्रात झालेल्या नव्या व्यापार करारामुळे भारतीय कापूस उत्पादक आणि कापड उद्योगासमोर मोठे आवाहन उभे राहण्याची दाट शक्यता आहे. नव्या करारानूसार अमेरिकन कापसापासून बांग्लादेशात तयार होणाऱ्या कपड्यांवर अमेरिकेत शून्य टक्के आयात शुल्क आकारले जाईल. मात्र भारतातून निर्यात होणाऱ्या तत्सम (कापड) उत्पादनांवर १८ टक्के कर कायम ठेवण्यात आला आहे. या निर्णयामुळे बांग्लादेश अमेरिकन कापसाला अधिक प्राधान्य देईल, अशी भीती तज्ज्ञांकडून व्यक्त केली जात आहे. आतापर्यंत बांग्लादेश हा भारतीय कापसाचा प्रमुख आयातदार देश राहिला आहे. विशेषतः महाराष्ट्रातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांसाठी बांग्लादेशची बाजारपेठ महत्त्वाची मानली जाते. सन २०२४ मध्ये भारताने जवळपास १५ हजार कोटींचे सुत बांग्लादेशात निर्यात केले होते. म्हणजे केवळ कापूसच नाही तर कापसावर प्रक्रिया करणाऱ्या सर्व उद्योगावर हे मोठे संकट मानले जात आहे.

जर बांग्लादेशाने अमेरिकन कापसाकडे वळण्याचा निर्णय घेतला, तर भारतीय कापसाची मागणी संपेल. बांग्लादेशने २०२४ मध्ये जवळपास १५ हजार कोटींचे सुत विकत घेतले होते हे विशेष. परिणामी देशांतर्गत बाजारात कापसाची मागणी घटेल. याचा थेट फटका कापूस उत्पादक शेतकऱ्यांना बसणार आहे. तसेच कापड उद्योगालाही आंतरराष्ट्रीय स्पर्धेला सामोरे जावे लागू शकते. कापूस उत्पादकांमध्ये असंतोष वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे. कापसाचे दर पडल्यास शेतकऱ्यांचे नुकसान टाळण्यासाठी राज्य सरकारने तातडीने 'भावांतर योजना' लागू करावी किंवा कापूस उत्पादकांसाठी ठोस बोनस जाहीर करावा. जर वेळीच उपाययोजना झाल्या नाहीत, तर आगामी खरीप हंगामात कापसाच्या पेऱ्यावर याचा मोठा परिणाम दिसून येईल.

आता संपूर्ण कापूस पट्ट्याचे लक्ष राज्य तसेच केंद्र सरकार या संकटावर काय तोडगा काढते, याकडे लागले आहे. बांगलादेश हा भारतीय कापसाचा प्रमुख ग्राहक आहे, मात्र आता तो अमेरिकन कापसाला प्राधान्य देण्याची भीती व्यक्त होत आहे. जर बांगलादेशाकडून भारतीय कापसाची मागणी घटली, तर देशांतर्गत बाजारपेठेत कापसाची आवक वाढून दर कोसळण्याची शक्यता आहे.



### वऱ्हाडातील शेतकऱ्यांसाठी चिंतेची बाब

आतापर्यंत बांगलादेश भारतीय कापसाचा मोठा ग्राहक होता, मात्र या नव्या करारामुळे विदर्भ आणि महाराष्ट्रातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होऊ शकते. काही शेतकऱ्यांकडे गेल्या वर्षीचा कापूस विकला नाही यंदाचा कापूस अजून काही भागात विकला गेला नाही. त्यामुळे पुढील हंगामात कापूस पिकाचा पेराच शेतकरी टाळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. राज्य शासनाने खरिप हंगामापुर्वी हमी भाव किंवा भावांतर योजना लागू करण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

### नेमका काय आहे हा 'झिरो टॅक्स' खेळ?

अमेरिकेने बांगलादेशसोबत वस्त्रोद्योग क्षेत्रात एक विशेष करार केला आहे. यानुसार बांगलादेशने जर अमेरिकन कापसाचा वापर करून कपडे तयार केले, तर त्या कपड्यांच्या अमेरिकेतील निर्यातीवर शून्य टक्के आयात शुल्क लागेल. याउलट, भारतातून अमेरिकेत निर्यात होणाऱ्या कपड्यांवर आजही १८टक्के कर कायम आहे. या १८ टक्क्यांच्या फरकामुळे बांगलादेश आता भारतीय कापसाऐवजी अमेरिकन कापसाला मोठी पसंती देणार हे स्पष्ट आहे.

# शहरात मोकाट, भटक्या कुत्र्यांची संख्या वाढतीच !

## निर्बीकरणासाठी खर्च होतो प्रति कुत्रा 1350 रूपये



प्रतिनिधी १२ फेब्रुवारी

**अकोला :** शहरात भटक्या कुत्र्यांची संख्या झपाट्याने वाढत असून नागरिकांचे दैनंदिन जीवन अक्षरशः धोक्यात आले आहे. पहाटे मॉर्निंग वॉकला जाणारे नागरिक असोत किंवा रात्री उशिरा घरी परतणारे दुचाकीस्वार, सर्वांनाच कुत्र्यांच्या झुंडींचा सामना करावा लागत आहे. दोन दिवसांपूर्वी पातूर तालुक्यातील आलेगावात एका पिसाळलेल्या कुत्र्याने धुमाकूळ घालत ३५ जणांना चावा घेतला आहे. हीच गत शहराची झाली आहे. यासाठी महापालिकेने बीड येथील युनिव्हर्सल ॲनिमल वेल्फेअर सोसायटीला भटक्या कुत्र्यांच्या निर्बीजीकरणाचे कंत्राट दिले होते. यासाठी प्रत्येक कुत्र्यामागे १३५० रुपयांचा खर्चही मंजूर करण्यात आला आहे. मात्र तरीही दिवसेंदिवस या कुत्र्यांची संख्या वाढत असल्याने नेमके शहरात कुत्र्यांचे निर्बीजीकरण कोठे सुरू आहे, असा प्रश्न नागरिकांना पडला आहे.

या मोकाट कुत्र्यांनी अक्षरशः धुमाकूळ घातला असून चौका-चौकात झुंडीने ते वावरत आहेत. अनेकदा कुत्रे दुचाकींच्या मागे धावत असल्याने अपघाताच्या घटनाही घडत आहेत. तरीही भटक्या कुत्र्यांच्या निर्बीजीकरणाबाबत महापालिका प्रशासनाची कारवाई फक्त कागदावरच सुरू असल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे. परिणामी कुत्र्यांची संख्या वाढतच असून नागरिकांचा संताप उफाळून आला आहे.

### आतापर्यंत किती निर्बीजीकरण केले?

निर्बीजीकरणाचे काम सुरू असल्याचा दावा प्रशासनाकडून केला जात असला तरी गत चार-पाच महिन्यांत किती कुत्र्यांची नसबंदी झाली, याची ठोस माहिती महापालिकेकडेच उपलब्ध नसल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. होमगार्ड कार्यालयामागील निर्बीजीकरण केंद्र, कुत्रे पकडण्याची व्हॅन आणि लसीकरणाची प्रक्रिया, हे सर्व फक्त कागदोपत्रीच मर्यादित असल्याची चर्चा रंगली आहे.

# अजितदादा पक्षात एकटे पडलेले आम्हाला दिसत होते- रोहित पवार

प्रतिनिधी १२ फेब्रुवारी

**मुंबई :** भारत - अमेरिका व्यापार करारावरून लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी थेट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना लक्ष्य केलं आहे. सपशेल शरणागती पत्करून सरकारने देश विकण्याची टीका त्यांनी केली आहे. त्याला सरकारच्या वतीने कोण आणि काय उत्तर देणार, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. अजित पवार यांच्या मृत्यूबद्दल संशय व्यक्त करणाऱ्या रोहित पवार यांना, चौकशीपर्यंत थांबण्याचा सल्ला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिला आहे. मात्र, या विषयाला हळूहळू राजकीय वळण लागण्याची शक्यता आहे. त्याचवेळी, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी दिल्लीत पंतप्रधान मोदी, गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली. त्या राज्यसभा खासदारकीचा राजीनामा देणार असल्याने त्याच्या जागी कोण, हा प्रश्न आहे. टी २० वर्ल्ड कप स्पर्धेत आज भारताचा सामना नामिबियाशी होणार आहे.

# कॉपीचा प्रकार आढळणाऱ्या केंद्राची मान्यता होणार रद्द -शिक्षणमंत्री

प्रतिनिधी १२ फेब्रुवारी

**नाशिक :** परीक्षा केंद्रातील शाळांना सीसीटीव्ही लावणे इतर सुविधा, पाणी, बसेस वेळेवर पोहचल्या पाहिजे यांसह सर्वच निर्देश दिले होते. तरीही १२ वी परीक्षांत कॉपीच्या घटना घडल्याचे दिसले. त्यामुळे, कॉपीच्या घटना समोर आलेल्या केंद्रावर रद्द बातलची कारवाई केली जाईल, यापुढे परवानगी दिली जाणार नाही. कॉपी करणाऱ्यांसह केंद्र प्रमुख आणि पालकांवरही कारवाई केली जाईल. ज्या शाळांनी पालन केले नाही, त्यांच्यावर कारवाई केली जाईल, अशी माहिती शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी दिली. राज्यात १२ वी बोर्ड परीक्षेला १० फेब्रुवारीपासून सुरुवात झाली असून राज्य सरकारच्या कॉपीमुक्त अभियानास पहिल्याच दिवशी हरताळ फासण्यात आल्याचे पाहायला मिळाले. विशेष म्हणजे, परीक्षा केंद्रावरील अधिकारी आणि पर्यवेक्षक विद्यार्थ्यांना कॉपी पुरवत असल्याचे सीसीटीव्हीत कैद झाले असून पालकांकडून संताप व्यक्त होत आहे. याप्रकरणी, जिल्ह्यातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी कारवाईचे निर्देश दिले असताना आता, शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनीही संबंधित केंद्रांची मान्यता रद्द करण्यात येईल.




# ज्येष्ठ नेते एकनाथ खडसेंविरोधात पोलिसात गुन्हा दाखल !

प्रतिनिधी १२ फेब्रुवारी

**जळगाव :** ज्येष्ठ नेते आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाचे नेते एकनाथ खडसे यांच्या अडचणीत मोठी वाढ झाली आहे. जळगाव जिल्ह्यातील रावेर तालुक्यातील सावदा पोलीस ठाण्यात त्यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे. त्यामुळे राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. विशेष म्हणजे हा वाद केवळ स्थानिक कारवाईपुरता मर्यादित न राहता, आता थेट राज्याच्या गृहखात्याशी जोडला गेला आहे. तुमचे गृहमंत्री काय करतात ते मला माहीत आहे, अशा आशयाचे वक्तव्य केल्याचा ठपका त्यांच्यावर आहे. तसेच पोलीस ठाण्यात गर्दी जमवून पोलिसांवर दबाव आणण्याचा आणि त्यांना शासकीय काम करण्यापासून रोखल्याचा आणि सरकारी कामात अडथळा आरोप लावण्यात आला आहे. सावदा परिसरात वाळू आणि इतर गौण खनिजांची अवैध वाहतूक होत असल्याच्या तक्रारी पोलिसांना मिळाल्या होत्या. त्या अनुषंगाने पोलिसांनी काही वाहने पकडली होती. या कारवाईत काही निष्पाप लोकांना त्रास दिला जात असल्याचा दावा करत एकनाथ खडसे आक्रमक झाले होते.

# टिळक रोड परिसरात दुचाकीच्या डिक्कीतून; ३ लाख रुपये लंपास

**अकोला:** शहरातील रामदासपेठ पोलीस स्टेशन हद्दीतील टिळक रोड स्थित आयसीआयसीआय बँक समोर दुचाकीच्या डिक्कीतून अज्ञात चोरट्याने ३ लाख रुपयांची रोकड लंपास केल्याची घटना घडली. मूळचे अमरावती येथील अंबिका नगरात राहणारे सुशांत जयंता बल्हाळ हे अकोल्यात नोकरी करतात, काल दुपारी सुशांत जयंता बल्हाळ हे टिळक रोड स्थित आयसीआयसीआय बँकेत ३ लाख रुपयांची रोकड आरटीजीएस करण्यासाठी आले होते. दरम्यान, दुचाकी क्रमांक एमएच ३० व्ही ७८४६ या गाडीची डिक्की उघडून पाहिले असता त्यांना डिक्कीतील रोकड चोरी गेल्याचे समजले. सुशांत बल्हाळ यांनी या बाबत रामदासपेठ पोलिसांना माहिती दिली. रामदासपेठ पोलिस व स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने घटनास्थळी पोहचून पंचनामा करून तपास सुरू केला आहे. घटनेचे सीसीटीव्ही फुटेज सुद्धा पोलिसांनी ताब्यात घेतले असून सीसीटीव्हीच्या आधारे चोरट्यांचा शोध पोलिस घेत आहेत.










CMYK

सिटी न्यूज अमरावती
गुरुवार, दि. १२ फेब्रुवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# तालुक्यात सिमेंट रस्त्याच्या कामात भ्रष्टाचाराचा आरोप; तक्रारदारास सरपंचांकडून धमकी

**मूर्तिजापूर:** तालुक्यातील सिरसो ग्रामपंचायत अंतर्गत बँक कॉलनी परिसरात बांधण्यात आलेल्या सिमेंट रस्त्याच्या कामात भ्रष्टाचार झाल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी विवेक मोहोळ यांनी गटविकास अधिकारी यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली असली, तरी अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही, असा आरोप तक्रारदारांनी केला आहे. तक्रारीनुसार, रस्त्याच्या कामात निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरण्यात आले असून मोजमाप, बिलिंग आणि प्रत्यक्ष काम यामध्ये तफावत असल्याचे निदर्शनास येत आहे. यामुळे सार्वजनिक निधीचा अपव्यय झाल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. दरम्यान, तक्रार मागे घेण्यासाठी सिरसोचे सरपंच विलास गवई यांनी तक्रारदार विवेक मोहोळ यांना धमकावल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे. ‘तक्रार मागे घ्या, अन्यथा तुमच्यावर अ‍ॅट्रॉसिटी दाखल करू’, अशी धमकी दिल्याचे मोहोळ यांनी सांगितले. या घटनेमुळे ग्रामपंचायत स्तरावरील दबावशाही आणि मनमानी कारभार पुन्हा एकदा चर्चेत आला आहे.

# मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली ‘वर्षा’वर अमरावती जिल्हा वार्षिक योजनेची बैठक

## ♦ आमदार रवी राणा यांची जिल्ह्याच्या विकासकामांसाठी ३०० कोटी अतिरिक्त निधी मंजुरीची व जिल्ह्याचे कामे अर्थसंकल्प बजेटमध्ये मंजूर करण्याची मागणी

प्रतिनिधी १२ फेब्रुवारी

**अमरावती:** जिल्हा वार्षिक योजना सन २०२६-२७ ला अंतिम रूप देण्यासाठी माननीय मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली ‘वर्षा’ शासकीय निवासस्थानी महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीस आमदार रवी राणा (अध्यक्ष, विधानसभा आश्वासन समिती) उपस्थित होते.

बैठकीदरम्यान अमरावती जिल्ह्यासाठी शासनाने मंजूर केलेल्या तरतुदीव्यतिरिक्त सुमारे ३०० कोटी रुपयांच्या अतिरिक्त निधीची मागणी आमदार रवी राणा यांनी केली. तसेच



जिल्ह्यातील विविध विकासकामांचा सन २०२६-२७ च्या अर्थसंकल्पात समावेश करून त्यांची नोंद ‘व्हाईट बुक’मध्ये करण्यात यावी, अशी लेखी मागणी त्यांनी मुख्यमंत्री यांच्याकडे सादर केली.

प्रस्तावित विकासकामांमध्ये अमरावती येथील राजकमल चौक उड्डाणपूल बांधकामासाठी १५० कोटी रुपये, हनुमान विकास आराखड्यासाठी २६१ कोटी रुपये, महानुभाव आश्रम (भाणखेडा) विकासासाठी २५ कोटी रुपये, छत्री तलाव विकासासाठी ५० कोटी रुपये, तसेच भातकुली (ता. भातकुली) व अंजनगाव बारी येथे मागासवर्गीय मुला-मुलींसाठी वसतिगृह बांधकामासाठी २५ कोटी रुपयांचा समावेश आहे.

याशिवाय, हायब्रीड अ‍ॅन्युइटी योजनेअंतर्गत प्रलंबित कामांसाठी निधी मंजूर करणे, मौजे माळेगाव येथे ‘बांबू गार्डन’च्या धर्तीवर ‘राम उद्यान’ विकसित करणे तसेच भातकुली येथे स्वतंत्र न्यायालयीन इमारत बांधण्यासाठी २५ कोटी रुपयांची तरतूद करण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला.

सदर मागण्यांवर मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सकारात्मक भूमिका घेत संबंधित प्रधान सचिव व विभागीय सचिव यांना सर्व प्रस्ताव आवश्यक ती कार्यवाही करून मान्यतेसाठी सादर करण्याचे निर्देश दिले. अमरावती जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने ही बैठक महत्त्वपूर्ण ठरली असून प्रस्तावित कामांना लवकरच प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही सुरू करण्यात येणार असल्याची माहिती बैठकीनंतर देण्यात आली. मागणी ची प्रत मा.पालकमंत्री ना. बावनकुळे यांनाही दिली. तसेच जिल्हाधिकारी यांनाही एक प्रत शासकीय यंत्रणा कडून प्रस्ताव पाठवण्याचे साठी आ. राणा कडून उमेश ढोणे यांनी आज दिली. यानंतर योग्य चाकोरीतून कामाचे मंजुरी ची प्रक्रिया योग्य चाकोरीतून होईल. बैठकीत महसूल मंत्री व पालकमंत्री अमरावती जिल्हा मा.चंद्रशेखर बावनकुळे, वित्त राज्यमंत्री ना.जैस्वाल, आमदार संजय खोडके, आ. प्रवीण तायडे, आ. उमेश यावलकर, आ. राजेश वानखडे, व शासनाचे विविध विभागाचे त्या मध्ये अमूस अश्विनी भिडे, वित्त विभागाचे सौरव विजय, नियोजन चे ओमप्रकाश गुप्ता, मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव विद्याधर महाले, उपसचिव प्रशांत मयेकर, आदी उपस्थित होते.

# मोर्शी येथे शुक्रवारी ‘मेगा कृषी क्रेडिट आऊटरीच’ कार्यक्रम

## ♦ शेतकऱ्यांना कर्ज मंजुरी पत्रांचे होणार वितरण

प्रतिनिधी १२ फेब्रुवारी

**अमरावती:** सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या वतीने मोर्शी येथे विशेष ‘मेगा कृषी क्रेडिट आऊटरीच’ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा शेतकरी मेळावा येत्या शुक्रवारी, १३ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ११ वाजता शिरभाते मंगलम, अमरावती रोड, मोर्शी येथे पार पडणार असून, यामध्ये बँकेच्या विविध नवीन शेती योजनांचे सादरीकरण आणि पात्र शेतकऱ्यांना प्रिन्सिपल सॅन्शन चेकचे वितरण करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाला मुख्य अतिथी म्हणून मोर्शीचे उपविभागीय अधिकारी प्रदीपकुमार पवार, गट विकास अधिकारी प्रिती खाटिंग, सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या मुंबई कार्यालयाचे उपमहाव्यवस्थापक जयशंकर प्रसाद उपस्थित राहणार आहेत. या मेळाव्यात बँक अधिकाऱ्यांमार्फत शेती कर्ज, शासनाच्या नवीन योजना आणि विविध सबसिडींबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन लाभणार आहे. या कार्यक्रमात सहभागी शेतकऱ्यांना बँकेच्या योजनांची माहिती देण्यासोबतच व्याजदरातील सवलतींबाबतही सादरीकरण केले जाईल. शासन आणि बँकेच्या या संयुक्त उपक्रमामुळे मोर्शी तालुक्यातील शेतकऱ्यांना आपला कृषी व्यवसाय विस्तारण्यासाठी संधी उपलब्ध होणार आहे.

# जिल्ह्यात ५४५ गावात पाणी टंचाई

## ♦ प्रशासनाचा १९ कोटींचा कृती आराखडा ७२२ उपाययोजना प्रस्तावित

प्रतिनिधी १२ फेब्रुवारी

**धारणी:** जिल्ह्यात दरवर्षी उन्हाळा सुरू होताच पाणीटंचाईचा प्रश्न उफाळून येतो. यंदाही जिल्ह्यातील ५४५ गावांमध्ये संभाव्य पाणी टंचाईचा सामना करावा लागणार आहे. त्यामुळे टंचाई निवारणार्थ जिल्हा परिषदेच्या ग्रामिण पाणी पुरवठा विभागाच्या वतीने १९ कोटी ७ लाख ५५ हजार रुपयांचा कृती आराखडा तयार केला आहे. टंचाई निवारणार्थ ७२२ उपाय योजना प्रस्तावित असून चिखलदरातील १५ गावांना सर्वाधिक झळ असल्याने तेथे टँकरने पाणी पुरवठा करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

जिल्ह्यात सध्या ५३७ नळयोजना, १७७२ हातपंप, ३९९ विद्युत पंप, १७७० सार्वजनिक व २०५६ खासगी विहिरींचे अधिग्रहन आदी उपाय योजना सुरू आहेत. तर आगामी टंचाई बघता १४ तालुक्यांमध्ये १४३ खासगी विहिरी अधिग्रहित कराव्या लागणार आहेत. याशिवाय



प्रशासनाने जलस्त्रोत अधिग्रहण, नळयोजना दुरुस्ती आणि गरजेनुसार टँकरपुरवठा अशा उपाययोजनांचा समावेश करण्यात आला आहे. त्यानुसार १४३ विहिरी अधिग्रहित करण्यात येणार असून २८६ ठिकाणी नळयोजनांची दुरुस्ती प्रस्तावित आहे. सर्वाधिक बाधित तालुक्यांमध्ये चिखलदरा तालुक्यात ८३ व धारणी तालुक्यात ७५ गावांचा समावेश आहे. याकरिता आता ७२२ योजना प्रस्तावित करण्यात आल्या असून जिल्हा प्रशासनाने टंचाई निवारणार्थ १९ कोटी ७ लाख ५५ हजारांच्या खर्चाला मान्यता दिली आहे. त्यामुळे टंचाई निवारणार्थ आता ह्या उपाययोजना राबविण्याकरिता प्रशासन सज्ज झाले आहे. चिखलदरा तालुक्यात दरवर्षीच पाणी टंचाईची झळ अधिक प्रमाणात दिसून येते. यंदा देखील तालुक्यात १५ गावांत टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा लागार आहे. तसेच नियोजन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.शासनाने आतापर्यंत गेल्या पाच वर्षात जिल्ह्यात कोट्यावधींचा निधी दिला विशेषताः या निधीतून मेळघाटात सर्वात जास्त निधी खर्च करण्यात आला. परंतु मेळघाटातील चिखलदरा व धारणी तालुक्यात अद्यापपर्यंत पाणी टंचाईवर तोडगा निघाला नाही. दरवर्षी फेब्रुवारी महिन्यापासूनच पाणी टंचाईची झळ आदिवासी बांधवांना सोसावी लागते. कोट्यावधी रूपये खर्च करून पाणी टंचाईचे निवारण का होत नाही. असा प्रश्न सर्वसामान्य नागरिकांना पडला आहे. जिल्हा परिषद, जिल्हा प्रशासन, यांच्या आराखड्यात सुध्दा मेळघाटात सर्वात जास्त निधी पाणी टंचाईवर दिला जातो हे विशेष.

# जिल्हाधिकाऱ्यांच्या अतिरिक्त मागणीला मुख्यमंत्री यांचा सकारात्मक प्रतिसाद

## ♦ राज्य नियोजन समितीची बैठक संपन्न

प्रतिनिधी १२ फेब्रुवारी

**अमरावती:** राज्य नियोजन समितीच्या बैठकीला जिल्हाधिकारी कार्यालयातील महसूल भवन येथून जिल्हाधिकारी आशिष येरेकर दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते. यावेळी त्यांनी जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी तीनशे कोटी रुपयांची अतिरिक्त मागणी केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या मागणीला सकारात्मक प्रतिसाद दिला. अमरावती जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी निधीची कमतरता भासू देणार नाही, असा विश्वास मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केला.

आमदार सुलभा खोडके यांच्यासह मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता मोहपात्र,



उपवनसंरक्षक अजुर्ना के. आर, जिल्हा नियोजन अधिकारी वर्षा भाकरे तसेच संबंधित विभाग प्रमुख यावेळी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांनी यावेळी जिल्ह्यातील विविध विभागांची माहिती, त्यांची चालू कामे, सद्यस्थिती तसेच भविष्यकालीन नियोजनाबाबत अभ्यासपूर्ण माहिती सादरीकरणाव्दारे सविस्तर दिली.

अमरावती जिल्ह्यात १४ तालुके आहेत. यामुळे विकास कामांसाठी अन्य जिल्ह्यांच्या तुलनेत विकास कामांसाठी जिल्ह्याला अतिरिक्त निधीची आवश्यकता आहे. सन २०२५ -२६ जिल्हा नियोजन समितीच्या आराखड्यानुसार ५२७ कोटी रुपयांची विकास कामे सुरु आहेत. सन २०२६ -२७ साठी ४३४.७१ कोटी रुपयांचे स्पिलिंग दिले आहेत. त्यानुसार आराखड्याचे काम करण्यात आले आहे. परंतु यामध्ये अतिरिक्त ३०० कोटी रुपयांची आवश्यकता असल्याचे श्री. येरेकर यांनी यावेळी मागणी केली. जिल्ह्याच्या विकासासाठी तालुका हा घटक महत्त्वपूर्ण आहे.जिल्ह्यातील लोकसंख्या, तालुक्यांची संख्या, भौगोलिक क्षेत्रफळ याचा विचार करून अतिरिक्त निधीच्या आवश्यकतेबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी आग्रही भूमिका मांडली. मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी या मागणीला सकारात्मक प्रतिसाद दिला. जिल्हा नियोजन समितीच्या निधीमधून जिल्ह्याच्या विकासासाठी अधिक उत्तम काम करणाऱ्यास निधीची कमतरता पडणार नसल्याचा विश्वास श्री. फडणवीस यांनी व्यक्त केला.

# प्रभात पाणी प्रबंध प्रकल्पाची लोककला व पथनाट्यव्दारे जनजागृती

प्रतिनिधी १२ फेब्रुवारी

**खामगांव** परमार्थ समाज सेवी संस्थाठ, खामगावच्या वतीने प्रभात पाणी प्रबंध प्रकल्पा अंतर्गत ठपाणी वाचवा स्वच्छता स्वीकारा तरच गांव निरोगी आणि समृद्ध होईलठ व जलसंवर्धन, स्वच्छता, आरोग्य, पाणी पंचायत, शेतीमध्ये पाण्याचा सुज्ञ वापर व पध्दती या विषयावर पातुरच्या स्व. विनायक राखोंडे प्रतिष्ठानच्या वतीने पथनाट्य सादर केले.

आधारित बुलढाणा जिल्ह्यातील व खामगांव तालुक्यातील जनुना, गारडगांव, आंतरज, शिराजगांव देशमुख, तांदुलवाडी, मंडका, निमकवाला, रोहना, निमकवळा, कोंटी, सारोळा



या दहा गावामध्ये ’जलसंवर्धन व आरोग्यठ तसेच स्वच्छ पिण्याचे पाणी व स्वच्छता विषयीक पद्धती, महिला आणि मुलींची सुरक्षा व आदर, पावसाचे पाणी साठविणे, पारंपारिक जलस्त्रोतांचे पुनर्जीवित करणे, हात धुण्याची सवय, जल सहेली व स्वच्छता नेत्या म्हणून महिलांची भूमिका, मुले व तरुणांचा सहभाग, सामुदायिक जबाबदारी, सरकारी योजनांची जोड या महत्वपूर्ण विषयावर नाटिकेतुन परिपूर्ण माहिती ही लोककला व पथनाट्यातून आणि विविध प्रबोधनातुन व लोकगीतातून देण्यात आली यावेळी नाटकाचे लेखन व दिग्दर्शक युवाश्री विशाल राखोंडे यांनी केले तर पातुर येथील स्व.विनायक राखोंडे प्रतिष्ठाण, व त्यांचे अध्यक्ष लोककवी सागर राखोंडे व त्यांच्या संचातील शाहीर सुखदेव उपर्वट, यांनी गावामध्ये लोककला व पथनाट्य जनजागृती कार्यक्रमातून जलसंवर्धन, स्वच्छ पिण्याचे पाणी आणि स्वच्छता विषयक पध्दती, वातावरण बदल, पर्यावरण, स्वच्छता आरोग्य, शिक्षण, उपजीविका, फॅशन व व्यसनमुक्ती बाबत उत्कृष्ट रित्या कार्यक्रम सादर केला.

# अंबा नगरीत व्हॅलेंटाईन डे निमित्त तरुणांत उत्साह

प्रतिनिधी १२ फेब्रुवारी

**अमरावती :** १४ फेब्रुवारी हा दिवस रोजी प्रेमाचा दिवस म्हणून ओळखला जाणारा व्हॅलेंटाईन डे अंबा नगरीत उत्साहात साजरा करण्यासाठी तरुणाई सज्ज झाली आहे.

विशेषतः तरुण-तरुणींमध्ये या दिवसाबद्दल मोठा उत्साह दिसून येत आहे. प्रेम, मैत्री आणि आपुलकी व्यक्त करण्यासाठी अनेकांनी खास नियोजन केले आहे. व्हॅलेंटाईन डे च्या नियोजनासाठी

शहरातील गिफ्ट सेंटरमध्ये दिवसभर गर्दी पाहायला मिळाली. येथे



लाल गुलाब, आकर्षक गुलदस्ते, चॉकलेट बॉक्स, हृदयाच्या आकाराचे केक, टेडी बेअर, शुभेच्छा कार्ड, परफ्यूम, घड्याळे आणि विविध सुंदर भेटवस्तूंची मोठ्या प्रमाणात खरेदी झाली.

कॅफे, हॉटेल्स आणि रेस्टॉरंटमध्ये कँडल लाईट डिनर, खास सजावट आणि ऑफर्समुळे तरुणांची उपस्थिती लक्षणीय दिसून येत आहे.काहींनी एकमेकांना हस्तनिर्मित भेटवस्तू, फोटो फ्रेम आणि खास संदेश देऊन हा दिवस अधिक संस्मरणीय करण्यासाठी नियोजन केले आहे.

व्हॅलेंटाईन डे हा केवळ प्रेम व्यक्त करण्याचा दिवस नसून नात्यांमध्ये विश्वास, समजूतदारपणा आणि

### १४ फेब्रुवारी साजरी तरुणाई सज्ज

आपुलकी वाढवण्याचा दिवस असल्याचे इथे आलेल्या तरुणाईंनी सांगितले. एकूणच अंबा नगरीत आनंदी वातावरणात व्हॅलेंटाईन डे साजरा करण्यासाठी तरुणाई सज्ज झाली असून कुठलीही अनुचित घटना घडू नये याकरता पोलिसांनी सुद्धा बंदोबस्त ठेवण्याची नियोजन केले असून छत्री तलाव, वडाळी गार्डन व इतर ठिकाणी पोलिसांचा वाच राहणार आहे.

# पत्रकारिता पुरस्कार वितरण सोहळा शनिवारी

## ♦ राज्य, विभागीय आणि जिल्हास्तरावरील पुरस्कारांचे होणार वितरण
## ♦ प्रकाश पोहरे, विलास बडे यांच्यासह ५ पत्रकारांचा होणार सन्मान

प्रतिनिधी १२ फेब्रुवारी

**अमरावती:** मराठी पत्रकार परिषदेशी संलग्नित असलेल्या अमरावती जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या वतीने भव्य पत्रकारिता पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. १४ फेब्रुवारी २०२६ शनिवार रोजी श्री. हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या स्व.सोमेश्वर पुसदकर ऑडिटोरियम येथे सायंकाळी ४.३० वाजता हा सोहळा पार पडणार आहे. राज्य, विभागीय तसेच जिल्हास्तरावरील विविध पत्रकारिता पुरस्कारांचे वितरण या सोहळ्यात मान्यवरांच्या हस्ते केले जाणार आहे.

अमरावती जिल्ह्यातील पत्रकारांची सर्वात मोठी संघटना असलेल्या अमरावती जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या वतीने दरवर्षी पत्रकारिता क्षेत्रात सेवा देणाऱ्या पत्रकारांचा विविध पुरस्कार देऊन सन्मान केला जातो. यावर्षी देखील संघटनेच्या वतीने हे पुरस्कार दिले जाणार आहेत. अमरावती जिल्हा मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष अनिल अग्रवाल यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम पार पडणार असून या



कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून अमरावती लोकसभा खासदार बळवंत वानखडे, राज्यसभा खासदार डॉ.अनिल बोंडे यांच्यासह अतिथी म्हणून जिल्हाधिकारी आशिष येरेकर, पोलिस आयुक्त राकेश ओला, सकाळचे समुह संपादक राहुल गडपाले यांची देखील उपस्थिती राहणार आहे.

या कार्यक्रमातून स्व.दादासाहेब काळमेघ यांच्या नावाने दिला जाणारा राज्यस्तरीय पत्रकारिता जीवन गौरव पुरस्कार ३० वर्षांची प्रदीर्घ पत्रकारिता सेवा तसेच राजकीय, पर्यावरण आणि शेतकऱ्यांच्या विषयावर लिखाण करण्यासाठी राज्यभर ख्याती असलेले दै.देशोन्नतीचे संपादक असलेले प्रकाश पोहरे यांना दिला जाणार आहे. ४१ हजार रूपये रोख, सन्मानचिन्ह, शाल आणि श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप असणार आहे. तसेच स्व.जुगलकिशोरजी अग्रवाल स्मृती राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्कार यावर्षी ३० वर्षांची पत्रकारिता सेवा आणि बातमीकडे पाहण्याचा सखोल दृष्टीकोण, अभ्यासू आणि अचूक विश्लेषण, प्रसंगावधान असलेले आयबीएन १८ चे वृत्त निवेदक विलास बडे यांना दिला जाणार आहे. ३१ हजार रूपये रोख, सन्मानचिन्हे, शाल आणि श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. तसेच विभागीय पत्रकारिता पुरस्कार यवतमाळ जिल्ह्यात नमो महाराष्ट्र या दैनिकाचे संपादक असलेले आणि ३० वर्षांचा पत्रकारिता क्षेत्राचा अनुभव असलेले वसंतराव घुईखेडकर यांना दिला जाणार आहे. दै.सकाळचे समुह संपादक राहुल गडपाले पुरस्कृत हा पुरस्कार २१ हजार रूपये रोख, सन्मानचिन्हे, शाल आणि श्रीफळ अशा स्वरूपाचा आहे.

अमरावती जिल्हा आणि ग्रामीण क्षेत्रात कार्य करणाऱ्यांना देखील जिल्हास्तरीय पुरस्कार संघटनेच्या वतीने दिले जातात. यामध्ये जिल्हास्तरीय (शहर) पत्रकारिता पुरस्कार दै. प्रतिदिन अखबारचे वृत्त संपादक प्रवीण आहुजा यांना त्यांच्या ३० वर्षांच्या प्रदीर्घ पत्रकारितेच्या सेवेसाठी दिला जाणार आहे. दै. विदर्भ मतदार पुरस्कृत या पुरस्काराचे स्वरूप ११ हजार रूपये रोख सन्मानचिन्हे, शाल आणि श्रीफळ असे असणार आहे. तसेच जिल्हास्तरीय (ग्रामीण) पत्रकारिता पुरस्कार दै.आपली मातृभूमीचे वरूड तालुका प्रतिनिधी असलेले चंद्रकांत भड यांना वरूड तालुक्यातील शेतकऱ्यांचे प्रश्न, शोषित समाजाचे प्रश्न या विषयावरील सातत्यपूर्ण लिखाणसाठी दिला जाणार असून पी.आर.पोटे एज्युकेशनल गृप ऑफ अमरावती यांच्याकडून पुरस्कृत असलेला हा पुरस्कार देखील ११ हजार रूपये रोख सन्मानचिन्हे, शाल आणि श्रीफळ अशा स्वरूपाचा असणार आहे.

# अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी परदेशातील उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती

**अमरावती :** राज्यातील अनुसूचित जमातीच्या गुणवंत विद्यार्थ्यांसाठी परदेशात उच्च शिक्षण घेण्याची संधी उपलब्ध असून आदिवासी विकास विभागामार्फत सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी परदेशातील नामांकित विद्यापीठांमध्ये पदव्युत्तर पदविका, पदव्युत्तर पदवी आणि पीएचडी करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांकडून शिष्यवृत्ती मिळण्यासाठी ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत. या योजनेंतर्गत ४० पात्र विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ दिला जाणार आहे. इच्छुक आणि पात्र विद्यार्थ्यांनी तत्काळ ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन आदिवासी विकास अपर आयुक्त आयुषी सिंह यांनी केले आहे. शिष्यवृत्तीसाठी पात्रतेचे निकष पुढीलप्रमाणे : उमेदवार व उमेदवाराचे आई, वडील अथवा पालक भारताचे नागरिक तसेच महाराष्ट्र राज्याचे अधिवासी असावे. शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये प्रवेश घेतलेल्या व प्रवेश घेण्यास इच्छुक असलेल्या उमेदवाराच्या परदेशातील शैक्षणिक संस्थेचे अद्यायावत (२०२६ मधील) क्यूएस वर्ल्ड रँकिंग २०० च्या आत असणे बंधनकारक आहे.


NHM राष्ट्रीय आरोग्य अभियान महाराष्ट्र

## राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत जिल्हा आरोग्य सोसायटी, जिल्हा परिषद, अकोला

### कंत्राटी पदभरती जाहीरात

राष्ट्रीय आरोग्य अभियान, अकोला अंतर्गत करार पद्धतीने Super Specialist, Specialist, Early Interventionist cum special educator, Audiologist & Speech therapist, Instructor for Hearing Impaired Children, Budget & Finance Officer, Optometrist. Dental Hygienist. Audiometrice Assistant, Dental assistant, District Programe manager Ayush, Facility Manager या पदाकरिता पात्र उमेदवाराकडुन दि. २०/०२/२०२६ पर्यंत अर्ज मागविण्यात येत आहे. पदासंबंधी सविस्तर जाहिरात, अर्जाचा नमुना जिल्हा परिषदेच्या **www.akolazp.gov.in** या वेबसाईट वर प्रकाशित करण्यात आलेली आहे. सदर वेबसाईटवर जाऊन जाहिरात व अटी शर्ती पाहावे व त्यानुसार उमेदवारांनी अर्ज करावे. सदर पदाच्या पुढील पद भरती प्रक्रिया बाबत सर्व माहिती जिल्हा परिषदेच्या वरील वेबसाईटवरच प्रकाशित करण्यात येईल. त्याकरिता कोणताही पत्रव्यवहार कार्यालयातर्फे उमेदवारास केला जाणार नाही, त्यामुळे जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासुन अंतिम निवड होईपर्यंत सदर वेबसाईट पाहणे ही उमेदवारांची स्वतःची जबाबदारी राहील याची नोंद घ्यावी.

**स्वाक्षरी**
**अध्यक्ष जिल्हा निवड समिती (NHM)**
**तथा मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, अकोला**

# ॲड. संजय तिकांडे यांना वास्तुशास्त्र विषयात पीएच.डी.

**अकोला:** येथील उर्जापर्व फाऊंडेशन संस्थेचे अध्यक्ष ॲड. संजय तिकांडे यांना उदयपूर येथील महर्षी कॉलेज ऑफ वैदीक ॲस्ट्रॉलॉजी संस्थेने वास्तुशास्त्र विषयातील योगदानाकरीता पीएच.डी. उपाधीने सन्मानित केले. 'निवासी परिसरात वास्तुशास्त्राचा परिणाम' या विषयावर त्यांनी संशोधन केले असुन मुंबई येथील डॉ. अनिल उपाध्याय यांनी त्यांना मार्गदर्शन केले. ॲड. संजय पाटील हे स्थानिक शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागात कार्यरत आहेत. उदयपूरला होणा-या सोहळयात त्यांना सन्मानित केले जाणार आहे. त्यांच्या यशाचे शिक्षण प्रसारक मंडळाचे



अध्यक्ष डॉ. ताराताई हातवळणे, सचिव गोपाल खंडेलवाल, उपाध्यक्ष अरूण कुळकर्णी, आमदार वसंत खंडेलवाल, ॲड. राजेश्वर देशपांडे, प्रतुल हातवळणे, रेखाताई खंडेलवाल, मधूर खंडेलवाल, प्राचार्य डॉ. जगदीश साबू यांनी अभिनंदन केले आहे.

## जिल्हाधिकारी कार्यालयात 'सुरक्षित इंटरनेट दिवस' साजरा

**अकोला:** ई-महाजालाचा जीवनाची विविध अंगे व्यापून टाकणारा विस्तार व कृत्रिम बुद्धिमत्तेच्या आजच्या काळात इंटरनेटचा वापर विवेक व सजगता बाळगून करणे आवश्यक आहे, असे आवाहन विविध मान्यवरांनी केले.

जिल्हा माहितीविज्ञान कार्यालयातर्फे 'सुरक्षित इंटरनेट दिवस' नियोजनभवनात साजरा करण्यात आला. अतिरिक्त जिल्हाधिकारी प्रमोद गायकवाड, निवासी उपजिल्हाधिकारी गजेंद्र मालठाणे, उपजिल्हाधिकारी विजय पाटील, उपजिल्हाधिकारी महेश परंडेकर, निखिल खेमनार, जिल्हा माहिती अधिकारी हर्षवर्धन पवार, जिल्हा माहितीविज्ञान अधिकारी अनिल चिंचोले, अति. जि. मा. विज्ञान अधिकारी श्रीनिधी वाजपेयी, सायबर सेलच्या पोलीस अधिकारी मनीषा तायडे यांच्यासह अधिकारी- कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

प्रारंभी सर्वांना इंटरनेट सुरक्षित वापराची शपथ देण्यात आली. डिजीटल पर्सनल डेटा प्रोटेक्शन ॲक्टबाबत श्रीमती वाजपेयी यांनी सविस्तर सादरीकरण केले. सायबर सेलतर्फे आशिष आमले यांनी सजग ऑनलाईन व्यवहार व दक्षतेबाबत माहिती दिली. महाजालातील आपली माहिती सुरक्षित राहण्यासाठी आवश्यक उपाययोजना व दक्षतेबाबत श्री. चिंचोले यांनी प्रास्ताविकातून माहिती दिली. ऋषिकेश आग्रे यांनी सूत्रसंचालन केले.

## जाण्यासाठी कार्यक्षम पाठपुरावा करा -जिल्हाधिकारी वर्षा मीना

**अकोला:** औद्योगिक वसाहतीत स्वतंत्र वीज उपकेंद्र, १०० फुटी जोडणी रस्ता, स्वतंत्र जलवाहिनी पूर्णत्वास जाण्यासाठी अधिक कार्यक्षमतेने पाठपुरावा करावा. त्याचप्रमाणे, कामे अपूर्ण ठेवणा-या कंत्राटदारांना काळ्या यादीत टाकण्याचे निर्देश जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी येथे दिले. जिल्हा उद्योग मित्र समितीची बैठक जिल्हाधिका- यांच्या अध्यक्षतेत झाली त्यावेळी त्या बोलत होत्या. महापालिका आयुक्त सुनील लहाने, अतिरिक्त जिल्हाधिकारी प्रमोद गायकवाड, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक संतोष बनसोड, विदर्भ चेंबर ऑफ कॉमर्सचे निकेश गुप्ता, अकोला औद्योगिक संघटनेचे अध्यक्ष मनोज खंडेलवाल, , महावितरणच्या अधिक्षक अभियंता प्रतीक्षा शंभरकर, साबांवि कार्यकारी अभियंता प्रसाद पाटील आदी उपस्थित होते.

# पाणीपुरी विक्रेत्याच्या घराला भीषण आग, लाखोचे नुकसान

प्रतिनिधी १२ फेब्रुवारी

**मूर्तिजापूर:** शहरातील दर्यापूर रोडवरील केसरी नंदन कॉलनी येथे पाणीपुरी विक्री करून उदरनिर्वाह करणाऱ्या योगेश नारायणस्वामी निंबेवार यांच्या घराला भीषण आग लागली

या आगीत एलईडी टीव्ही, फ्रिज, कम्प्युटर, कुलर, मोबाईल तसेच कपाटातील कपडे व इतर घरगुती साहित्य जळून खाक



झाले असून लाखो रुपयांचे नुकसान झाल्याचा अंदाज आहे.

आग लागल्याची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी मदतकार्य सुरू केले. सुदैवाने या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र, आगीत घरातील सर्व साहित्य जळून खाक झाल्याने निंबेवार कुटुंबावर मोठे आर्थिक संकट ओढावले आहे.

आगीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून संबंधित यंत्रणांकडून तपास सुरू असल्याची माहिती आहे. नागरिकांनी प्रशासनाकडून पीडित कुटुंबाला तातडीची मदत देण्याची मागणी केली आहे.

# माळेगाव बाजारच्या सरपंच सीमा अढाऊ पदावरून अपात्र

प्रतिनिधी १२ फेब्रुवारी

**तेल्हारा :** तालुक्यातील माळेगाव बाजार ग्रामपंचायतीच्या सरपंच सीमा अढाऊ यांना पदाचा गैरवापर, आर्थिक व्यवहारातील अनियमितता व कर्तव्यात कसूर केल्याच्या ठपक्यावरून पदावरून अपात्र ठरविण्यात आले आहे. अमरावती विभागीय आयुक्तांनी ९ फेब्रुवारी रोजी हा आदेश पारित केला. माळेगाव बाजार ही तालुक्यातील मोठ्या ग्रामपंचायतींपैकी एक आहे. ग्रामस्थ ज्ञानेश्वर आखरे यांनी सरपंचांविरोधात विभागीय आयुक्तांकडे अपात्रतेबाबत याचिका दाखल केली होती. यामध्ये १४ व्या वित्त आयोगांतर्गत ग्रामपंचायत कार्यालयासाठी खरेदी करण्यात आलेल्या साहित्याच्या व्यवहारात अनियमितता झाल्याचा आरोप करण्यात आला होता.

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अकोला यांच्या अहवालात सरपंच व ग्रामपंचायत सचिव संयुक्तपणे जबाबदार असल्याचे नमूद करण्यात आले. अहवालात आर्थिक गैरव्यवहार व निधीच्या अपहाराचा उल्लेख असून संबंधित रक्कम वसूल करण्याचे तसेच फौजदारी कारवाई करण्याचे निर्देश देण्यात यावेत, अशी शिफारस करण्यात आली होती. दोन्ही बाजूंचे युक्तिवाद ऐकल्यानंतर विभागीय आयुक्त सूरज बागमारे (अमरावती विभाग) यांनी महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ मधील कलम ३९(१) अन्वये सीमा अढाऊ यांना सरपंच व ग्रामपंचायत सदस्यपदासाठी अपात्र घोषित केले आहे.

या प्रकरणात अर्जदारांच्या वतीने ॲड. जितेंद्र काकडे यांनी बाजू मांडली. आदेशानंतर तालुक्यातील राजकीय वर्तुळात चर्चा रंगली असून पुढील कार्यवाहीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# नगरपरिषदेकडून ऑनलाईन सभांना नकार

## ◆ थेट प्रक्षेपण न झाल्याने पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह

प्रतिनिधी १२ फेब्रुवारी

**तेल्हारा:** शासनाने २० मे २०२२ रोजी नगरपरिषद व नगरपंचायतींच्या सर्वसाधारण तसेच मासिक सभांचे थेट प्रक्षेपण व व्हिडिओ रेकॉर्डिंग बंधनकारक करणारा आदेश जारी केला आहे. मात्र या शासन आदेशाची तेल्हारा नगरपरिषदेत अंमलबजावणी होत नसल्याचे चित्र सध्या दिसून येत आहे.

नगरपरिषद प्रशासनाकडून सभांचे ऑनलाईन आयोजन व थेट प्रक्षेपणास नकार दिला जात असून, प्रत्यक्ष उपस्थितीतच सभा घेण्यात येत आहेत. यामुळे नगरपरिषद सभांमध्ये होणारे महत्त्वाचे निर्णय, विकासकामांचे ठराव व नागरिकांशी संबंधित विषय सामान्य जनतेपासून दूर राहत असल्याचा आरोप केला जात आहे.

शासन परिपत्रकानुसार नगरपरिषद सभांचे व्हिडिओ रेकॉर्डिंग अधिकृत संकेतस्थळावर, स्थानिक माध्यमे व सोशल मीडियावर प्रसिद्ध करणे तसेच ते किमान सहा महिने जतन करणे बंधनकारक आहे. तरीही संबंधित आदेशांकडे दुर्लक्ष केले जात असल्याने पारदर्शकता व उत्तरदायित्वाबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत.

या प्रकारामुळे नागरिकांचा माहितीचा अधिकार बाधित होत असून, लोकशाहीतील पारदर्शकता व लोकसहभाग या मूलभूत तत्त्वांची पायमल्ली होत असल्याची चर्चा शहरात सुरू आहे. तेल्हारा नगरपरिषद प्रशासनाने शासन आदेशांची तात्काळ अंमलबजावणी करून सभांचे ऑनलाईन आयोजन व थेट प्रक्षेपण सुरू करावे, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. याबाबत प्रशासनाची अधिकृत भूमिका काय असणार, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

# महाशिवरात्री निमित्त आगरला अखंड हरिनाम सप्ताह व संगीत शिवमहापुराण कथा

प्रतिनिधी १२ फेब्रुवारी

**अकोला:** आगर येथील महादेव मंदिराच्या प्रांगणात महाशिवरात्री महोत्सव भक्ती भावाने साजरा करण्यात येत आहे. ९ फेब्रुवारी पासून महोत्सवाला आरंभ झाला. सुरूवातीचे तिन्ही दिवस भाविक कीर्तनात रंगले.

गुरुवार १२ रोजी ग्रामगीता प्रबोधनकार डॉ. शिवदास उद्धवराव गाडेकर महाराज, १३ रोजी महंत अमरानंद गिरीजी महाराज उर्फ गजानन महाराज सारसे सुकळी, १४ रोजी हभ्प माणिकराव महाराज भगत कोकलवाडी जिल्हा बुलढाणा



यांचे कीर्तन होईल. रविवार १५ रोजी महाशिवरात्रीला महारुद्राभिषेक व महा सत्संग आर्ट ऑफ लिविंग परिवाराकडून होईल. शरदजी डोल्हारकर व महा सत्संग समूहाचा त्यात सहभाग राहील.

सोमवारी सकाळी ११ वाजता पंडित उमाशंकर आर्या महाराज यांचे काल्याचे किर्तन व महाप्रसाद वितरणाने महोत्सवाची सांगता होईल. दैनंदिन कार्यक्रमात काकडा आरती, सकाळी ५ ते ६, शिव महापुराण सकाळी ९ ते ११ व दुपारी ३ ते ५.३०, हरिपाठ सायंकाळी ६ ते ७ आणि हरिकीर्तन रात्री ८ ते १० वाजेपर्यंत. गायनाचार्य विष्णुदास चोरे कंचनपूर, मृदुंगाचार्य शाम बळीरामजी चोरे कंचनपूर, टाळकरी मंडळीत कंचनपूर, पाळोदी, गोतरा, लोणाग्रा, हातला, खांबोरा, सखाराम टाळकरी मंडळी आगर व पंचक्रोशीतील टाळकरी मंडळी आहे. व्यासपीठ नेतृत्व पंडित उमाशंकर आर्या महाराज यांचे आहे. सांब सदाशिव महोत्सवाचा सांब सदाशिव महादेवाच्या असीम कृपेने सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताह व संगीत शिव महापुराण रुपी भक्तिमय ज्ञानगंगेत सहभागी होऊन लाभ घ्यावा असे आवाहन सांब सदाशिव सेवा समिती आगर, आर्ट ऑफ लिविंग परिवार आगर आणि समस्त गावकऱ्यांनी केले आहे.

# खंडेलवाल इंग्लिश स्कूलमध्ये आनंद मेळावा उत्साहात

प्रतिनिधी १२ फेब्रुवारी

**अकोला:** गोडबोले प्लॉट स्थित खंडेलवाल इंग्लिश स्कूलमध्ये स्काऊट आणि गाईड विषया अंतर्गत आनंद मेळावा घेण्यात आला. स्काऊट आणि गाईड ही स्वयंसेवी शैक्षणिक चळवळ आहे जी मुलांमध्ये नेतृत्व गुण, शिस्त, सेवाभाव आणि जबाबदार नागरिकत्वाची भावना विकसित करते. शाळेतील विद्यार्थ्यांनी अतिशय उत्साहात या मेळाव्यात सहभाग घेतला.

विविध रुचकर पदार्थांचे त्यांनी स्टॉल लावले. शाळेतील शिक्षक वृंद , शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी मेळाव्यात विद्यार्थ्यांनी स्टॉलवर मांडलेल्या विविध पदार्थांचा आस्वाद घेतला. आनंद मेळाव्यात स्टॉल लावलेल्या विद्यार्थ्यांनी व्यवसायाचे ज्ञान



अनुभवले, स्व कमाईचे समाधान विद्यार्थ्यांमध्ये दिसून आले. गाईडर उषा साळवीकर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले. शाळेत स्टॉल लावलेल्या विद्यार्थ्यांचे शाळेच्या मुख्याध्यापिका धनश्री पांडे यांनी कौतुक केले.

# 'व्हॅलेंटाईन डे'च्या नावाखालील पाश्चात्य विकृती आणि ड्रग्ज संस्कृती रोखा

## ◆ हिंदू जनजागृती समितीसह हिंदुत्ववादी संघटना आक्रमक

प्रतिनिधी १२ फेब्रुवारी

**अकोला:** १४ फेब्रुवारीला 'व्हॅलेंटाईन डे'च्या नावाखाली शहरात फोफावणारा पाश्चात्य चंगळवाद, अंमली पदार्थांचा वाढता वापर आणि महिलांची होणारी छेडछाड या गंभीर समस्यांकडे लक्ष वेधण्यासाठी हिंदू जनजागृती समिती आणि विविध हिंदुत्ववादी संघटनांच्या वतीने प्रशासनाला 'जागे' करण्यात आले. बुधवारी जिल्हाधिकारी आणि पोलिस प्रशासनाला निवेदन देऊन, या दिवशी होणारे गैरप्रकार रोखण्यासाठी कठोर पावले उचलण्याची मागणी करण्यात आली.

उपजिल्हाधिकारी गजेंद्र मालठाणे यांना समितीच्या वतीने निवेदन देण्यात आले. या निवेदनात प्रामुख्याने नमूद केले की, व्हॅलेंटाईन डे च्या नावाखाली आयोजित खाजगी पार्ट्यांमध्ये मद्य आणि अंमली पदार्थांचा सर्रास वापर होतो. तसेच, हिंदू तरुणींना 'लव्ह जिहाद'च्या जाळ्यात ओढण्याचे प्रकार रोखण्यासाठी प्रशासनाने सतर्क राहावे. शाळा-महाविद्यालयांमध्ये 'व्हॅलेंटाईन डे' ऐवजी 'मातृ-पितृ पूजन दिन' साजरा करण्यासाठी प्रशासनाने प्रोत्साहन द्यावे, जेणेकरून विद्यार्थ्यांवर सुसंस्कार होतील, अशी महत्त्वपूर्ण मागणीही यावेळी करण्यात आली.




पोलिस अधीक्षक कार्यालयात निवेदन देण्यात आले. पोलीस प्रशासनाकडे मागणी करण्यात आली की, १४ फेब्रुवारी रोजी महाविद्यालय परिसर, उद्याने आणि पर्यटन स्थळांवर साध्या वेशातील पोलीस तसेच 'दामिनी आणि निर्भया पथके' तैनात करावीत. तसेच, सायलेन्सरमध्ये बदल करून कर्णकर्कश आवाज करत वेगाने गाड्या चालवणाऱ्या हुल्लडबाजांवर वाहतूक शाखेने कठोर कारवाई करावी आणि महिलांच्या सुरक्षिततेची दक्षता घ्यावी, असे निवेदनात नमूद केले आहे.

हिंदू जनजागृती समितीचे अमोल वानखडे यांच्या नेतृत्वाखाली निवेदन देताना विदर्भ चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीजचे अध्यक्ष निकेश गुप्ता, योगेश अग्रवाल, उदय महा, अमोल पारीस, नंदकिशोर मेहेरे, प्रमोद अग्निहोत्री, अजय खोत, गिरीश कुलकर्णी, सौ. अश्विनी सरोदे, संजय निमखंडे, सुनील पाटील, प्रशांत पाटील उपस्थित होते.

भारतीय संस्कृतीचे पावित्र्य जपण्यासाठी प्रशासन आणि समाजाने एकत्र येणे काळाची गरज आहे, ठ असा सूर धर्मप्रेमींनी व्यक्त केला. स्थानिक प्रशासनाने या मोहिमेला सकारात्मक प्रतिसाद दिला असून, नागरिकांनीही या मोहिमेत सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# शहर पोलिसांनी केले २० क्विंटल गोमांस जप्त, दोन बैल व एका गायीला जीवदान

वि. प्रतिनिधी १२ फेब्रुवारी

**अकोट :** शहर पोलिस स्टेशन अंतर्गत गोवंश कत्तलीविरोधात मोठी कारवाई करण्यात आली. २० क्विंटल गोमांसासह ४ लाख ६० हजार ९०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तसेच दोन बैल व एक गायीला जीवदान देण्यात आले आहे.

११ फेब्रुवारी रोजी गुप्त बातमीदाराकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे उपविभागीय पोलिस अधिकारी अकोट यांना देण्यात आली. त्यांच्या आदेशानुसार पोलीस पथकाने दोन पंचांसह कुरेशीपुरा, शौकतअली चौक, अकोट येथे वेगवेगळ्या ठिकाणी छापे टाकले. कारवाई दरम्यान आरोपी त्यांच्या राहत्या घराच्या समोरील खोलीत गोवंश कत्तल करताना आढळून आले.

पोलीसांनी त्यांच्या घरातून दोन बैल व एक गाय ताब्यात घेतले असून, आरोपींविरुद्ध पोलीस



स्टेशन अकोट येथे कायदेशीर फिर्याद दाखल करण्यात आली आहे. आरोपीं मध्ये मुस्ताक अहमद अब्दुल कदीर (७१), शेख मुस्तफा शेख शेरू ( ६५), जुनेद अहमद जहुर अहमद (३६), जियाउल हक अब्दुल रफीक (३८), साजीद अहमद अब्दुल सादीक ( ३६), शेख मुरसलीन शेख मुजफ्फर (४३), फरार इरफान अहमद अब्दुल हनीफ (५२) रा. कुरेशीपुरा शौकत अली चौक अकोट यांचा समावेश आहे. त्यांच्याविरुद्ध महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियमातील कलम ५, ५(क), ९(अ) अंतर्गत वेगवेगळे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. आरोपींकडून २० क्विंटल गोवंश मास तसेच दोन बैल व एक गाय असा एकूण ४,६०,९०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अप्पर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी, सहाय्यक पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी अकोट निखील पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अमोल माळवे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. या पथकात डी.बी. पथक इंचार्ज पोउपनि निलेश बारहाते, पोउपनि शिवणकर, पोहेका गणेश सोळके, अनिल सिरसाट, नरेंद्र जाधव, सुबोध खंडारे, नापोकॉ विपुल सोळके, पोकॉ विजय तायडे, कपील राठोड, नितेश सोळके, अश्विन चौव्हाण व आरसीपी पथक सहभागी होते.

# हिवरखेड पोलिसांची अवैध तांदुळ विक्रीवर कारवाई

प्रतिनिधी १२ फेब्रुवारी

**हिवरखेड:** पोलिस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या तळेगाव बाजार येथे अवैध तांदूळ साठा पोलिसांनी जप्त केला. मात्र तांदूळ विकत घेणारे अडगाव येथील आरोपी पसार होण्यात यशस्वी झाले.




अंदाजे चार क्विंटल तांदूळ जप्त करण्यात आला. या संदर्भात पोलिस फरार आरोपींचा तपास करीत आहेत. तसेच या प्रकरणी शहनिशा देखील करण्यात येत आहे.

# अल्पभूधारक शेतकऱ्याची मुलगी बनली कृषी अधिकारी

प्रतिनिधी १२ फेब्रुवारी

**आलेगाव :** अल्पभूधारक शेतकरी कन्येने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचा गड सर करीत कृषी अधिकारी पदापर्यंत मजल गाठली आहे. निशा गणेश ढोणे असे या लढवय्या तरुणीचे नाव आहे.

आलेगावची रहिवासी असलेल्या निशाचे आई वडील शेती करतात. या कुटुंबाकडे पाच एकर शेती आहे. निशा यांनी पहिली ते चौथी जि. प शाळेत शिक्षण घेतल्या नंतर पुढील शिक्षण नवोदय




विद्यालयातून पूर्ण केले.

पी के व्ही कृषी अकोला महाविद्यालयातून बी. टेक (ॲग्री) पूर्ण केले. अकोला येथे शिक्षण घेत असताना निशाची पावले कृषी विद्यापीठातील स्पर्धा परीक्षा फोरमकडे वळली. जिद्दीच्या जोरावर व मेहनतीने कुर्षीअधिकारी पदावर निवड झाली. त्यामुळे तिचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

# श्री द्वारकेश्वर येथे महाशिवरात्री उत्सवाचे आयोजन

प्रतिनिधी १२ फेब्रुवारी

**अडगांव:** येथील पुरातन श्री द्वारकेश्वर संस्थान येथे महाशिवरात्री उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

संस्थानचे विश्वस्त बबनआप्पा धाके आणि अनिलआप्पा धाके यांच्या मार्गदर्शनाखाली ९ फेब्रुवारी ते १५ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत विविध धार्मिक कार्यक्रमांचा सप्ताह आयोजित करण्यात आला आहे.

महाशिवरात्रीच्या दिवशी दि.१५/२/२६ रोजी कीत्येक वर्षाची परंपरा लाभलेल्या भांबेरी येथून येणाऱ्या प.पू. भाऊसाहेब देवमास्तर यांच्या पालखीचे आगमन होत असते. ही पालखी संपूर्ण गावातून मोठ्या दिमाखात मिरवली जाणार असून, टाळ-मृदंगाच्या




गजरात निघणारी ही मिरवणूक भक्तांच्या डोळ्यांचे पारणे फेडणारी ठरते. गावातील पालखी मार्गावर ठिकठिकाणी चौकाचौकात चहा, दूध फराळ, फलाहार पिण्याच्या पाण्याची व्यवस्था अशा सेवांचे वाटप ग्रामस्थांतर्फे स्वयंस्फूर्तीने केले जाते.तर मिरवणुक संस्थानवर पोहचल्यावर भाविकांना फराळाचे वाटप करुण दुसऱ्या दिवशी भव्य महाप्रसादाचे आयोजन द्वारकेश्वर संस्थान तर्फे करण्यात येत असते.

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
गुरुवार, दि. १२ फेब्रुवारी २०२६ https://epaper.citynewssuperfast.com

# किचन सेटसाठी रात्रभर मुक्काम!

प्रतिनिधी १२ फेब्रुवारी

**यवतमाळ :** दारव्हा येथील शंकर जिनिंग परिसरातील इमारत व इतर बांधकाम कामगार विभागाच्या साहित्य वाटप केंद्रावर मजुरांचे प्रचंड हाल होत आहेत. गृहउपयोगी भांडी, सुरक्षा किट आणि विशेषतः किचन सेट मिळवण्यासाठी कामगारांना आपला जीव धोक्यात घालावा लागत असल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे. रात्री थंडी आणि दुपारचे कडक ऊन असतानाही गरोदर महिला, लहान मुले आणि मजूर तासनतास रांगेत उभे राहावे लागत आहेत. पिण्याचे पाणी, सावली किंवा बसण्याची सोय नसल्याने हे हाल अधिक तीव्र झाले आहेत.

## मजुरांच्या जीवाशी खेळ



■ यवतमाळ हॉकर्स युनियनचे अध्यक्ष सुरज खोब्रागडे यांनी या गैरसोयी टाळण्यासाठी तालुक्याच्या ठिकाणी किचन सेट आणि साहित्य वाटप करण्याची मागणी केली आहे. अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे.

ग्रामीण भागातील महिलांना किचन सेट आणि इतर साहित्य मिळवण्यासाठी शंभर ते दीडशे किलोमीटर अंतर पार करावे लागते. बच्ची व्यवस्था नसल्याने अनेकांना खाजगी वाहनाने जावे लागते. नंबर मिळवण्यासाठी अनेक महिला आणि कामगार एक दिवस अगोदर रात्रीपासून तेथे मुक्काम करतात. रात्रभर जागून राहूनही व्यवस्थित वाटप होत नसल्याने त्यांचा वेळ आणि श्रम व्यर्थ जात आहेत. जिल्हाधिकारी आणि लोकप्रतिनिधींनी तात्काळ हस्तक्षेप न केल्यास मोठ्या प्रमाणात आंदोलन होण्याची शक्यता आहे. शासकीय योजनांच्या अंमलबजावणीत अशा प्रकारचे गोंधळ आणि दुर्लक्ष सामान्य मजुरांच्या जीवनावर परिणाम करत आहे. ग्रामीण भागातील कामगारांना मूलभूत सुविधा न देता केवळ वाटप केंद्र उभारणे पुरेसे नाही. प्रशासनाने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन त्वरित उपाययोजना कराव्यात, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे. या घटनेमुळे यवतमाळ जिल्ह्यातील कामगारांच्या स्थितीवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

■ किचन सेटसाठी रात्र काढावी लागते किंवा मुक्काम करावा लागतो, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.या नियोजित गोंधळामुळे मजुरांच्या जीविताला धोका निर्माण झाला तर जबाबदार कोण, असा संतप्त सवाल बहुजन मुक्ती पार्टीचे लोकसभा प्रभारी बिमोद मुधाने यांनी उपस्थित केला आहे. कामगारांना सन्मानाने साहित्य वाटप करण्याची मागणी केली आहे.

# टिपेश्वर अभयारण्यातील 'रिसॉर्ट'ला भीषण आग



## सर्व रिसॉर्ट मालकांवर गुन्हे दाखल करा

■ यवतमाळ जिल्ह्यातील केळापूर तालुक्यातील टिपेश्वर वन्यजीव अभयारण्यालगतच्या इको सेन्सिटिव्ह झोन (ESZ) क्षेत्रात उभारण्यात आलेल्या रिसॉर्ट्सविरोधात कारवाईची मागणी तीव्र झाली आहे. सुन्ना गेटलगत रिसॉर्टला लागलेल्या आगीच्या घटनेनंतर या संपूर्ण प्रकरणाने गंभीर वळण घेतले आहे. या पार्श्वभूमीवर अंकित बबनराव नैताम (जिल्हा उपाध्यक्ष, यवतमाळ जिल्हा ट्रायबल फोरम व संचालक, पर्यावरण स्वास्थ संस्था) यांनी पांढरकवडा पोलीस स्टेशन येथे ठाणेदारांकडे अधिकृत लेखी तक्रार दाखल करून इको सेन्सिटिव्ह झोनमधील सर्व बेकायदेशीर रिसॉर्ट मालकांवर फौजदारी गुन्हे नोंद करण्याची ठाम मागणी केली आहे.



प्रतिनिधी १२ फेब्रुवारी

**यवतमाळ :** टिपेश्वर अभयारण्याच्या सुन्ना गेटजवळील 'सुर बार रिसॉर्ट' येथे मध्यरात्री अचानक भीषण आग लागून मोठे नुकसान झाले. या आगीत रिसॉर्टचा डायनिंग हॉल, फर्निचर तसेच अन्य साहित्य जळून खाक झाले. सुदैवाने या घटनेत कोणतीही जिवितहानी झाली नाही.

प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, रात्री उशिरा रिसॉर्टमधून धूर आणि ज्वाळा उसळताना दिसताच परिसरात एकच खळबळ उडाली. कर्मचाऱ्यांनी आणि स्थानिक नागरिकांनी तत्काळ आग विझविण्याचा प्रयत्न केला. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दल घटनास्थळी दाखल झाले. मोठ्या प्रयत्नांनंतर आग आटोक्यात आणण्यात यश आले. आग वेळीच नियंत्रणात न आल्यास ती थेट अभयारण्यात पसरू शकली असती, अशी भीती व्यक्त होत आहे. ही घटना इको सेन्सिटिव्ह झोनमध्ये घडल्याने पर्यावरणीय नियमांचे पालन होत आहे का, यावर प्रश्न उपस्थित होत आहेत. या संवेदनशील क्षेत्रात व्यावसायिक बांधकामांना परवानगी कशी दिली जाते, असा सवाल स्थानिक नागरिकांकडून उपस्थित करण्यात येत आहे. आगीमुळे रिसॉर्ट परिसरातील काही झाडे व झुडपेही जळाल्याची माहिती समोर आली आहे. इको सेन्सिटिव्ह झोनमध्ये कार्यरत असलेल्या रिसॉर्टमध्ये अग्निसुरक्षा यंत्रणा, आपत्कालीन साधने आणि प्रतिबंधात्मक उपाययोजना कितपत सक्षम आहेत, याची सखोल चौकशी करण्याची मागणी होत आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली समिती अस्तित्वात असतानाही या भागात मोठ्या प्रमाणावर रिसॉर्ट बांधकामे सुरू असल्याने प्रशासनावर टीका होत आहे. दरम्यान, आगीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून संबंधित विभागाकडून तपास सुरू आहे.

# आर्णी नगर परिषदेत 'एबीसी' खर्चावरुन वाद; २६ लाखांचा खर्च तपासण्याची मागणी

प्रतिनिधी १२ फेब्रुवारी

**आर्णी :** भटके कुत्रे निर्बिजीकरण (एबीसी) कार्यक्रमासाठी दोन वर्षांत २६ लाख रुपये खर्च झाल्याच्या मुद्द्यावरून आर्णी नगर परिषदेच्या सर्वसाधारण सभेत जोरदार चर्चा रंगली. सन २०२३–२४ व २०२४–२५ या कालावधीत १,६३५ श्वानांचे निर्बिजीकरण करण्यात आल्याची माहिती प्रशासनाने दिली. हा खर्च नगर परिषदेच्या सामान्य निधीतून करण्यात आल्याने पारदर्शकतेचा प्रश्न उपस्थित झाला आहे.

नगरसेवक रियाज सय्यद यांनी निविदा प्रक्रिया, संबंधित संस्थेची निवड, वार्डनिहाय श्वानांची संख्या व खर्चाचे तपशील सभागृहासमोर सादर करण्याची मागणी केली. "जनतेच्या पैशांचा विनियोग होत असताना पूर्ण पारदर्शकता आवश्यक आहे," असे ते म्हणाले. आवश्यक कागदपत्रे न मांडल्यास पुढील सभेत हा मुद्दा अधिक तीव्र करण्याचा इशाराही त्यांनी दिला. सभागृहातील काही सदस्यांनीही सामान्य निधीतील मोठ्या खर्चाची सविस्तर छाननी व्हावी, अशी भूमिका मांडली. आता प्रशासनाकडून संबंधित कागदपत्रे सादर होतात का, याकडे लक्ष लागले आहे.







■ "वाढीव मालमत्ता कर आणि इतर करांमुळे नागरिक आधीच त्रस्त असताना, सामान्य निधीतील 26 लाखांच्या खर्चात पारदर्शकता नसेल तर हा प्रकार प्रेताच्या टाळूवरील लोणी खाण्यासारखा आहे. भटके कुत्रे निर्बिजीकरण कार्यक्रमासह प्रशासकीय काळातील सर्व कामांचे त्रयस्थ संस्थेकडून ऑडिट व्हावे आणि गैरप्रकार आढळल्यास दोषींवर कठोर कारवाई झालीच पाहिजे."
- गणेश हिरोळे, माजी आरोग्य सभापती

# वाळू वाहतुकीवर पोलिसांची कारवाई; लाखोंचा मुद्देमाल जप्त

प्रतिनिधी १२ फेब्रुवारी

**वणी :** तालुक्यात सुरू असलेल्या अवैध वाळू वाहतुकीविरोधात मारेगाव पोलिसांनी धडक कारवाई करत कुंभा–करनवाडी मार्गावर साखरा गावाजवळून विना परवाना वाळू वाहतूक करणारा टिप्पर पकडला. या कारवाईत ६ लाख २० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करून दोन आरोपींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. १० फेब्रुवारी २०२६ रोजी पहाटे पेट्रोलिंगदरम्यान एएसआय दिगांबर किनाके व पोकॉ शुभम उईके यांनी संशयास्पद टिप्पर (MH-29-T-1533) थांबवून तपासणी केली असता त्यात ४ ब्रास वाळू आढळली. चालककाडे वैध परवाना नसल्याने टिप्पर जप्त करण्यात आला. ज्ञानेश्वर ठाकरे व सचिन दरने यांच्यावर बीएनएस, मोटार वाहन कायदा व महाराष्ट्र जमीन महसूल संहिता अंतर्गत गुन्हा दाखल झाला आहे. ही कारवाई ठाणेदार श्याम वानखेडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. अवैध वाळू वाहतुकीला आळा घालण्यासाठी पोलिसांची कारवाई सुरूच राहणार आहे.

# आमणी (खू) येथे दारुमुळे तरुणाचा मृत्यू?

## संतप्त ग्रामस्थांचा महागाव पोलिस ठाण्यावर मोर्चा

प्रतिनिधी १२ फेब्रुवारी

**यवतमाळ :** महागाव तालुक्यातील आमणी (खु) येथे बेकायदेशीरपणे सुरू असलेल्या गावठी हातभट्टीच्या दारूमुळे प्रकाश अमरसिंग जाधव (वय ३३, रा. आमणी खुर्द) या तरुणाचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या घटनेमुळे संपूर्ण गावात संतापाची लाट उसळली आहे. घटनेनंतर बुधवारी (ता. ११) रात्री सुमारे आठ वाजता ग्रामस्थांनी महागाव पोलिस ठाण्यावर तीव्र धडक मोर्चा काढला. युवक, महिला आणि ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते."हातभट्टी कायमची बंद करा", "दोषींना तात्काळ अटक करा" अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला. मृत तरुणाच्या कुटुंबावर दु:खाचा डोंगर कोसळला असून गावात शोककळा पसरली आहे.

ग्रामस्थांच्या मते, गावात हातभट्टीची दारू विक्री अनेक वर्षांपासून उघडपणे सुरू आहे. याबाबत वारंवार तक्रारी करूनही ठोस कारवाई झाली नसल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला. मोर्चादरम्यान महिलांनी आक्रमक भूमिका घेत दारूअड्डे तात्काळ उद्ध्वस्त करण्याची मागणी केली. युवकांनी संबंधित दारूव्यावसायिकांवर खुनाचा गुन्हा दाखल करून कठोर कारवाई करावी, तसेच या अवैध धंद्याला छुपे पाठबळ देणाऱ्यांचीही चौकशी करावी, अशी मागणी निवेदनाद्वारे केली. काही काळ पोलिस ठाण्याबाहेर तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले होते. संतप्त ग्रामस्थांनी ठोस आश्वासन मिळेपर्यंत आंदोलन मागे न घेण्याची भूमिका घेतली. अखेर पोलिस निरीक्षक धनराज निळे यांनी घटनेची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात येईल तसेच गावातील सर्व बेकायदेशीर दारूअड्ड्यांवर संयुक्त छापेमारी मोहीम राबविण्यात येईल, असे आश्वासन दिले. दरम्यान, कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी अतिरिक्त पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. आमणी (खु) परिसरात तणावाचे वातावरण असून प्रशासनाच्या पुढील कारवाईकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे. घटनेनंतर संतप्त नागरिकांनी राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले असून, "बेकायदेशीर हातभट्टी सुरू असताना विभाग नेमके काय करत आहे?" असा सवाल उपस्थित केला आहे.





# परसोडा ग्रा.पं.चा प्लास्टिकमुक्त गावासाठी पुढाकार

प्रतिनिधी १२ फेब्रुवारी

**आर्णी :** परसोडा ग्रामपंचायतीतर्फे प्लास्टिक निर्मूलन व कचरा व्यवस्थापनाबाबत जनजागृती करण्यासाठी हळदीकुंकू कार्यक्रमाचे औचित्य साधत महिलांना कचरा कुंड्यांचे वाटप करण्यात आले. प्लास्टिकमुक्त गावाचा संकल्प प्रत्यक्षात आणण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात आला.

मुख्यमंत्री पंचायत राज अभियानांतर्गत आयोजित या कार्यक्रमात गावातील प्रत्येक कुटुंबातील महिलांना ग्रामपंचायत कार्यालयात कचरा कुंड्या देण्यात आल्या. प्लास्टिकचा वापर कमी करून ओला व सुका कचरा वेगळा करण्याची सवय लागावी, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश असल्याचे सांगण्यात आले.

या वेळी सरपंच प्रा. स्वप्ना अतुल पाटील देशमुख, उपसरपंच सुनंदा पत्रे, ग्रामपंचायत सदस्य मंगला चौधरी व अर्चना राठोड, ग्रामसंघ अध्यक्षा रोशनी, स्वाती पत्रे, पशुसखी आशा सोळंके, प्रभात संघ प्रमुख संध्या देशमुख, मंदा कोल्हे, जनिता गुडे, मंजुषा मिसाळ, राजश्री कोल्हे, सारिका कोल्हे, नलू पारधी, इंदिरा सोळंके, कमला जुडे, गहुकर्णा कुडवे, अनुसया पत्रे, रेखा गुडे, वनिता शेळके, वनिता डहाणे, सुनिता देशमुख, लक्ष्मी सोळंके, सुनिता सोळंके, बेबीबाई राठोड, पायल पवार, कल्पना जाधव, सविता जाधव, पुष्पा जाधव, चंदा जाधव आदी उपस्थित होत्या.





कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी ग्रामपंचायत पदाधिकारी व महिला बचत गटांच्या सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले. या उपक्रमामुळे परसोडा गाव प्लास्टिकमुक्त करण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल टाकले असल्याची भावना व्यक्त होत आहे.

# युवक महोत्सव 2026 चे उद्घाटन

प्रतिनिधी १२ फेब्रुवारी

**दारव्हा :** जिजामाता कला महाविद्यालय दारव्हा येथील सांस्कृतिक विभागाव्दारा आयोजित युवक महोत्सव 2026 चे उद्घाटन मुंगसाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुनील चकवे यांच्या हस्ते दारव्हा पोलीस स्टेशनचे ठाणेदार शिवप्रसाद मुळे यांच्या प्रमुख उपस्थितीत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. यादव सोळंके यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले. या कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते राजमाता जिजाऊ व संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली.

याप्रसंगी मान्यवरांनी विद्यार्थ्यांना या कार्यक्रमाचा मनसोक्त आनंद घेऊन सर्वांनी सहभागी व्हावे अशा शुभेच्छा दिल्या.



या कार्यक्रमाचे आयोजन तथा संचालन डॉ. पुरुषोत्तम बांडे यांनी केले, तर प्रास्ताविक डॉ. रामधन हिरे यांनी केले, आभार प्रदर्शन प्रा. कु. रूपाली कणसे यांनी मानले. युवक महोत्सव अंतर्गत सामूहिक व एकल नृत्य वादविवाद व वक्तृत्व स्पर्धा,नाटक, गीत गायन स्पर्धा इत्यादी कार्यक्रमांचे सादरीकरण करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाच्या यशस्वीते करिता प्रा. डॉ.रमेश खंडारे, प्रा. डॉ. जयवंत जुकरे, प्रा. डॉ. प्रिती ठाकरे डॉ.राजेश गेडाम नितेश कदम सचिन माटोळे सतीश सरतापे विनोद कंटाळे सोमराज लोहकरे पायल राऊत अक्षया जयसिंगपूरे पायल पवार वैष्णवी राठोड प्रीती राठोड प्रेम मनवर प्रथमेश आडे राहुल आडे ध्रुव घोडे तन्वी खाडे प्रीती गंगावणे संचिता हिंगमिरे पायल राठोड वेदिक ढवक राणी बगमारे साक्षी बगमारे रिद्धी आवारे कोमल लोहकरे नंदनी राठोड, नंदनी जोगदंड रितू चव्हाण वैष्णवी ठोंबरे वैष्णवी नाटकर आदी परिश्रम घेतले.

# छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त निबंध स्पर्धेचे आयोजन

प्रतिनिधी १२ फेब्रुवारी

**मुळावा :** रयतेचे राजे, कुळवाडी भूषण छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या विचारांचा प्रसार जनसामान्यांपर्यंत व्हावा या उद्देशाने वैश्विक विकास संस्था, मुळावा (ता. उमरखेड) यांच्या वतीने निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.



या स्पर्धेसाठी महाराजांचे नियोजन व अंमलबजावणीचे कौशल्य, त्यांची पर्यावरण नीती, सर्वधर्म समभावातून स्वराज्य निर्मिती, छत्रपती शिवाजी महाराजांचे जल व्यवस्थापन, शिवाजी महाराजांचे नेतृत्व कौशल्य या विषयांवर निबंध लिहिणे अपेक्षित आहे.

स्पर्धेतील विजेत्यांसाठी आकर्षक पारितोषिके जाहीर करण्यात आली आहेत. प्रथम पारितोषिक रुपये १००१ हे स्व. प्रेमलता वासुदेवराव झरकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ अजय झरकर यांच्या तर्फे देण्यात येणार आहे. द्वितीय पारितोषिक स्व. निर्मलाबाई आनंदराव सूर्यवंशी यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ नरेंद्र सूर्यवंशी यांच्या तर्फे प्रदान करण्यात येईल. तृतीय पारितोषिक रुपये ५०१ व प्रमाणपत्र हे वैश्विक विकास संस्था, मुळावा यांच्या तर्फे देण्यात येणार आहे. तसेच प्रोत्साहनपर पारितोषिक म्हणून रुपये ३०१ स्व. शामराव कदम यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ कैलासराव कदम व स्व. गिताबाई वाकडे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ विजयकुमार वाकडे यांच्या तर्फे देण्यात येणार आहेत. ही स्पर्धा सर्वांसाठी खुली असून इच्छुक स्पर्धकांनी आपले निबंध दिनांक १६ फेब्रुवारी २०२६ पर्यंत महाराष्ट्र इंग्लिश स्कूल, मुळावा; महाराष्ट्र इंग्लिश स्कूल, शेंबाळपिंपरी; तसेच पंचकृष्ण कला व विज्ञान महाविद्यालय, मुळावा येथे सादर करावेत, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

# महिला व युवतींच्या कबड्डी सामन्यांचे भव्य आयोजन

प्रतिनिधी १२ फेब्रुवारी

**यवतमाळ :** महिला व युवतींचे भव्य कबड्डीचे खुले सामने वेडद पोड, तालुका केळापूर या छोट्याशा गावात 8 फेब्रुवारी 2026 रोजी आयोजित करण्यात आले. आयोजक संस्था केळापूर व झरी जामणी या आदिवासी बहुल तालुक्यात काम करणाऱ्या सामाजिक संस्था होत्या. यात नवी उमेद, सहारा, दिन, दासा, संत कबीर, सावित्रीबाई फुले, कोरो इंडिया व कोलाम समूह संस्था यांचा समावेश होता. या आयोजनामागील मुख्य उद्देश असा होता की ग्रामीण भागातील स्त्रियांना विशेषता आदिवासीबहुल स्त्रियांचे सक्षमीकरण करून त्यांना आत्मनिर्भर बनवणे व सामाजिक विकासाच्या प्रवाहात आणणे हा होता. या कार्यक्रमाचे आयोजक अमित कुलकर्णी, इरफान शेख, रत्नदीप देवतळे, अतिष समृतवार, कैलास आत्राम, संगीता मडावी, कविता जुमनाके हे होते. कार्यक्रमाचे उद्घाटन प्राचार्य डॉ धर्मेंद्र तेलगोटे यांनी केले; कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी युवराज वर्णे होते; तर प्रमुख अतिथींमध्ये वासुदेव गेडाम सरपंच कोंडी, अशोक कोहचाळे पोलीस पाटील मोची, अनिता धुर्वे, श्री गजानन आत्राम पोलीस पाटील वेडद हे होते. आदिवासी बहुल भागात अशा प्रकारचा स्पर्धा घेण्याचा हा पहिला प्रयोग होता यापूर्वी अशा कोणत्याही ठिकाणी अशा स्पर्धा विशेषता महिलांच्या स्पर्धा घेतल्या गेल्या नाहीत .या स्पर्धेसाठी प्रेक्षकांचा फार मोठा प्रतिसाद होता. या स्पर्धेत पुढील गावातील महिलांचे संघ सहभागी झाले होते मांगुर्डा पोड, सावंगी पोड, वेडद पोड, वांजरी पोड, पांढरकवडा, आवळगाव, अकोली पोड, वाघाडी (पारधी समुदाय) जानकाई व घोटी या आदिवासी बहुल गावातील महिलांच्या संघांनी सहभाग घेतला एकूण 13 संघ सहभागी होते. 18 ते 20 आणि पुढे 50 या वयोगटातल्या मुली व स्त्रिया संघांमध्ये सहभागी झाल्या होत्या. प्रत्येक संघात तरुण व मध्यमवर्गीय किंवा साठी पार केलेल्या काही स्त्रिया असे चित्र होते. गेम पॅन्ट, साड्या,लुगडे, सलवार कुर्ता अशा वेश्यामध्ये ह्या सगळ्या स्त्रिया सामना खेळत असताना दिसून आल्या. स्पर्धेच्या शेवटी प्रथम पारितोषिक वांजरी पोड (पारितोषिक 7000 रुपये युवराज वरणे) द्वितीय पारितोषिक पांढरकवडा (पाच हजार रुपये प्राचार्य धर्मेंद्र तेलगोटे यांच्याकडून) तृतीय पारितोषिक आवळगाव (तीन हजार रुपये अशोक कोहचाडे यांच्याकडून) आणि चतुर्थ पारितोषिक अकोली पोड (2 हजार रुपये श्री इरफान शेख व रत्नदीप देवतळे यांचे कडून) गावातील महिला संघांनी पटकावले.



समारोपीय कार्यक्रमात विजेत्या संघाला रोख स्वरूपात पारितोषिक बक्षीस व मोठी ट्रॉफी देण्यात आली आणि प्रत्येक खेळाडूला ट्रॉफी दिली. या ट्रॉफीची जबाबदारी कोरो इंडिया मुंबई यांच्याकडून सांघिक व वैयक्तिक ट्रॉफी देण्यात आली. या दिवसभरातील संपूर्ण सामन्यांची धावती कॉमेंट्री बाबाराव आत्राम यांनी केली तर स्कोरर म्हणून काशिनाथ टेकाम व सतीश आत्राम यांनी काम पाहिले. एक्सपर्ट कॉमेंटेटर म्हणून डॉ. तेलगोटे उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता दीपक आत्राम, कैलास आत्राम, कविता जुमनाके, संगीता मडावी, अनिता दुर्वे, अजय गुरनुले, मनीष राजनकर, प्रमोद वालदे, अरविंद बोरकर, रणजीत देवतळे, दीपक मरघडे यांनी अथक परिश्रम घेतले.

# जिल्हास्तरीय स्पर्धेत वालतूर तांबडे शाळा ठरली उपचॅम्पियन

प्रतिनिधी १२ फेब्रुवारी

**पुसद :** जिल्हा परिषद यवतमाळ खेळ, क्रीडा व कला संवर्धन मंडळ यांच्या विद्यमाने जिल्हास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेचे व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन 5 ते 7 फेब्रुवारी 2026 जिल्हा क्रीडा संकुल यवतमाळ येथे आयोजन करण्यात आले होते. यवतमाळ जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत जिल्हा परिषद उच्च प्राथमिक मराठी शाळा वालतुर तांबडे या शाळेने वयोगट 6 ते 11 व 11 ते 14 या वयोगटात उपचॅम्पियनशिप मिळवली. सलग दुसऱ्या वर्षी जिल्हास्तरीय उपचॅम्पियनशिप मिळवून वालतुर तांबडे या शाळेने इतिहास घडवला.

वयोगट 6 ते 11 खो खो खेळात मुली विजयी ठरल्या. 4×100 रिले या धावण्याच्या स्पर्धेत मुली विजयी ठरल्या. लांब उडी स्पर्धेत कुमारी परिदी गव्हाळे द्वितीय आली.



वयोगट 11 ते 14 खो खो या खेळात मुले उपविजेते ठरले. 4×100 रेले प्रकारात मुले प्रथम व मुली द्वितीय आल्या. 100 मीटर धावण्याच्या स्पर्धेत चाहत जाधव प्रथम. 200 मीटर धावण्याच्या स्पर्धेत आराध्या गव्हाळे द्वितीय. लांब उडी भावेश राठोड द्वितीय.थाळीफेक मध्ये आर्यन राठोड प्रथम आला.

त्यांच्या या यशाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक मधुकर मोरझडे, शिक्षक भारत राठोड, विकास वाकडे, प्रफुल्ल पांडे, जयसिंग चव्हाण, रोहिदास पवार, श्रीराम आढाव, संभाजी हंगरगे, विक्रम राठोड यांनी अभिनंदन केले. तसेच सहाय्यक गटविकास अधिकारी संजयजी राठोड, गटशिक्षण अधिकारी धीरज आडे, विस्तार अधिकारी उमेश वाघमारे, अमित बोजेवार, शितलकुमार वानखडे, चोंढी केंद्राचे केंद्र समन्वयक प्रल्हाद जाधव, तालुका क्रीडा सचिव गोविंद जाधव व शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष संतोष तांबारे, आलासिंग राठोड, बीबीषण राठोड, सदानंद राठोड, दिलीप जाधव, परमानंद राठोड, प्रकाश चिरंगे, राहुल जाधव, बलदेव राठोड, उदल जाधव, रविराज राठोड, गजानन हमाने, चंदल पवार, उल्हास राठोड, केवल भिसे व समस्त ग्रामस्थांनी अभिनंदन केले.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
गुरूवार दि. १२ फेब्रुवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com



## कृषिमंत्र्यांच्या 'पालक' जिल्ह्यात शेतकऱ्याचा 'छळ', त्यांना कोणाचे 'बळ'...




### शेतकऱ्यांचा संपला सहनशिलतेचा 'अंत'...

# भ्रष्टअधिकाऱ्यांना नाही 'खंत'!

### अधिकाऱ्यांकडून शेतकऱ्याला बुटाने मारहाण, आत्महत्या करण्याचा सल्ला, तक्रार कर्त्याला धमक्या

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●





आकांक्षीत जिल्हा म्हणून वाशीम जिल्ह्याची नोंद आहे. जिल्ह्यात मोठे प्रकल्प नाहीत ज्याचे जीवनमान शेतीवरच अवलंबून आहे. मात्र, शासकीय योजना खऱ्या शेतकऱ्यापर्यंत पोहोचत नाहीत. न्याय मागणाऱ्या शेतकऱ्यावरच अधिकाऱ्यांकडून अन्याय होत आहे. मंगरूळपीर तालुक्यातील गोगरी येथील शेतकऱ्याला कृषी अधिकाऱ्याने बुटाने मारहाण केली.शेलुखडसे येथील पोकराची तक्रार करणाऱ्या शेतकऱ्याला जीवे मारण्याची धमकी कृषी अधिकाऱ्याने दिली. तर आता वहीवाटीचा रस्ता माघणाऱ्या शेतकऱ्याला नायब तहसीलदारानी चक्क आत्महत्याकरण्याचा सल्ला दिला. यावरून जिल्ह्यात लोकशाही नसून अधिकारीशाही सुरू आहे. न्यायासाठी जिल्ह्यातील शेतकऱ्याचा सहनशिलतेचा अंत झाला असून भ्रष्टअधिकाऱ्यांना त्याची खंत नाही.

त्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणविस साहेब 'देवा' अजब तुझा न्याय, न्याय माघणाऱ्या शेतकऱ्यावरच होतोय अन्याय अशी म्हणण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे. कृषी मंत्र्याच्या पालक जिल्ह्यातच अधिकाऱ्याकडून छळ होत असून त्यांना कोणाचे बळ मिळत आहे अशी चर्चाही होत आहे. रिसोड तालुक्यातील केनवड येथे वहिवटीच्या रस्त्यासाठी हक्क मागणाऱ्या शेतकऱ्याला नायब तहसीलदाराकडून आत्महत्या करण्याचा सल्ला दिल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे. या संपूर्ण प्रकाराचे व्हिडिओ सध्या सोशल मीडियावरील विविध व्हॉट्सॲप ग्रुपवर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहेत. परिणामी शेतकऱ्यांसोबत नेहमीच उद्धट भाषा वापरणारे नायब तहसीलदार कुळमेठे पुन्हा एकदा वादाच्या भोवऱ्यात अडकले आहेत. या गंभीर बाबीकडे तहसीलदा प्रतीक्षा तेजनकर यांनी विशेष लक्ष घालावे अशी अपेक्षा तालुक्यातील शेतकरी व्यक्त करीत आहेत.

केनवड येथील शेतकरी गुलाब लक्ष्मण दांडगे यांचा वहिवटीचा रस्ता सुमारे ९ ते १० महिन्यांपासून अडविण्यात आला असून, त्यामुळे शेतातील तूर, हरभरा व गहू घरी आणता येत नसल्याची तक्रार शेतकऱ्यांकडून करण्यात आली आहे. सदर प्रकरण मामलेदार कार्यालयात प्रलंबित असून, गेल्या अनेक महिन्यांपासून केवळ तारखांवर तारखा दिल्या जात असल्याचे सांगण्यात आले.मा. तहसीलदारांच्या सूचनेनुसार स्थळ पाहणीसाठी सबंधित अधिकारी शेतात आले होते.

या पाहणीदरम्यान पंचनामा करण्यात आला; मात्र तो एकतर्फी व अर्धवट असल्याचा आरोप सदर शेतकऱ्यांनी केला आहे. याच वेळी हक्काबाबत चर्चा सुरू असताना, सबंधित शेतकऱ्याने आमच्यावर अन्याय झाला तर, आम्हाला आत्महत्या करावी लागेल ! असे उद्विग्न अवस्थेत म्हटले आहे. मात्र यावर नायब तहसीलदार कुळमेथे यांनी करा मग.. असे उत्तर दिल्याने या प्रकरणाला वेगळी कलाटणी मिळाली आहे.परिणामी या विषयात तालुक्यात उलटसुलट चर्चांना उधाण आले आहे.

शेतकऱ्यांचा आरोप असा आहे की, पाहणीसाठी आलेल्या अधिकाऱ्यांनी रस्त्याची पाहणी करण्याऐवजी शेतकऱ्यांशी बोलताना उद्धट, आरडाओरड करणाऱ्या व अंगावर गेल्यासारख्या भाषेत संवाद साधला. 'आत्महत्या करा' असे शब्द वापरताना संबंधित अधिकारी पदाची गुर्मी असल्यासारखे, माजात बोलत होते. शेतकऱ्यांशी सन्मानाने वागण्याऐवजी दडपशाहीच्या सुरात संवाद साधल्याचा आरोप करण्यात आला आहे. या घटनेदरम्यान शेतकऱ्यांनी स्वतः चित्रीत केलेले व्हिडिओ तसेच स्पॉट पंचनामा करतानाचे दृश्य व्हॉट्सॲप ग्रुपवर फिरत असून, त्यामुळे रिसोड तहसील प्रशासनाचा कारभार पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. मात्र, या प्रकरणी अद्याप अधिकृत प्रशासनाकडून कोणतीही प्रतिक्रिया देण्यात आलेली नाही. महत्त्वाचे म्हणजे, रिसोड तहसीलमध्ये नायब तहसीलदार शेतकरी व नागरिकांशी उद्धटपणे वागणुकीची ही एकमेव घटना नसून, यापूर्वीही अशा प्रकारच्या अनेक तक्रारी समोर आल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे तहसील प्रशासनाच्या एकूणच कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे.संबंधित प्रकरणांची निष्पक्ष चौकशी करून कारवाईची मागणी होत आहे.

## थोडक्यात

### देशाचा अर्थसंकल्प हा सर्वसामान्य समाज घटकांच्या सक्षमीकरणावर भर देणारा



●सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर●

**भाजपचे प्रदेश प्रवक्ते आशिष चांदराणी यांची माहिती**

संसदेत देशाचा अर्थसंकल्प नुकताच जाहीर झाला असून भारताचा हा अर्थसंकल्प युवाशक्ती, वेगवान व समावेशक विकास आणि वित्तीय शिस्त यांचा संतुलित मिलाफ असून विकसित भारत या ध्येयाशी सुसंगत राहून सर्वसामान्य समाज घटकांच्या सक्षमीकरणावर भर देणारा आहे, अशी माहिती भाजपचे प्रदेश प्रवक्ते आशिष चांदराणी यांनी ता.११ रोजी स्थानिक विश्रामगृह येथे आयोजित पत्रकार परिषदेत दिली.

अर्थसंकल्पाबाबत माहिती देताना चांदराणी पुढे म्हणाले की, माफक महागाई, स्थिर व विश्वासार्ह आर्थिक धोरणे आणि ठोस वित्तीय शिस्त राखण्यावर अर्थसंकल्पात भर देण्यात आला आहे. शेतकरी, मत्स्य व्यवसाय व ग्रामीण भागाच्या दृष्टीने शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी उत्पादकता वाढीवर भर देऊन ५०० जलाशय व अमृत सरोवर यांचे एकत्रीत विकास मत्स्य व्यवसाय यासाठी मूल्य साखळी बळकट करून महीला गट यांना संधी देण्यात आली आहे. तसेच पशु संवर्धन, सहकार क्षेत्र, जेष्ठ नागरिक, दिव्यांग ,महिला स्वयं सहाय्यता गट यांचेसाठी अर्थ संकल्पात तरतूद करण्यात आली आहे.याचप्रमाणे करदात्यांसाठी सकारात्मक तरतुदी करण्यात आल्या असून दीर्घकालीन ऊर्जा सुरक्षेसाठी २० हजार कोटी रुपयांचा आराखडा तयार करण्यात आला असल्याचे त्यांनी सांगितले.यावेळी भाजपचे जिल्हाध्यक्ष पुरुषोत्तम चितलांगे, सुनील मालपाणी, डॉ दिलीप रत्नपारखी, पालिकेचे पाणी पुरवठा सभापती नगरसेवक गणेश खोडे,ॲड .प्रा. सुधिर घोडच?,नगरसेवक नंदलाल पवार,राजू जयस्वाल, श्रीहरी इंगोले यांचेसह उमेश भोजने,नरेश ठाकूर यांचेसह भाजपाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# उलटले महिने दोन, ७/ १ २ नोंदीसाठी अडवते कोण?

### आदेश मिळावा म्हणून अर्ज केला, तरी फाईल पैश्यापोटी तर नाही ना धुळीतचं पाडली...

●सिटी न्युज ब्युरो @ केनवड●

महसूल प्रशासनातील प्रक्रियात्मक विलंबामुळे नागरिकांची कामे वेळेत पूर्ण होत नसल्याचे चित्र पुन्हा एकदा समोर आले आहे. नियम, कायदे आणि शासन निर्णय अस्तित्वात असतानाही काही प्रकरणांमध्ये अर्जांवर निर्णय होण्यास अपेक्षेपेक्षा अधिक कालावधी लागत असल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीबाबत नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

मौजे कळमगाव येथील रहिवासी दिनकर जिजेबा बोरे यांनी मौजे कोळगाव येथील रहिवासी गणेश रामभाऊ काच गुंडे यांच्याकडून मौजे कळमगाव येथील गट नंबर २८/१ मधील प्लॉट नंबर ६, क्षेत्रफळ ९९ चौरस मीटर, हा प्लॉट दिनांक ५ एप्रिल २०१३ रोजी नोंदणीकृत खरेदीखताद्वारे कायदेशीररीत्या खरेदी केला आहे. खरेदीला बारा वर्षांचा कालावधी उलटूनही सातबारावर नाव नोंदणीची प्रक्रिया अद्याप पूर्ण न झाल्याने संबंधित नागरिकाला अडचणींचा सामना करावा लागत आहे.सदर प्लॉटच्या सातबारा उताऱ्यावर स्वतःच्या नावाची नोंद घेण्यासाठी दिनकर बोरे यांनी दिनांक



९ डिसेंबर २०२५ रोजी तहसील कार्यालयात अधिकृत अर्ज सादर केला होता. मात्र अर्ज सादर करून आजपर्यंत ६४ दिवस उलटूनही संबंधित अर्जावर कोणताही अंतिम आदेश किंवा लेखी निर्णय कळविण्यात आलेला नाही. या कालावधीत कोणतीही हरकत, नोटीस अथवा कारणही लेखी स्वरूपात देण्यात आलेले नसल्याचे अर्जदाराचे म्हणणे आहे.

महत्त्वाचे म्हणजे, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ तसेच महाराष्ट्र जमीन महसूल (रेकॉर्ड ऑफ राइट्स) नियम, १९७१ नुसार नोंदणीकृत खरेदीखताच्या आधारे सातबारावर नाव नोंदणीसाठी अर्ज प्राप्त झाल्यानंतर ३० दिवसांच्या आत फेरफार नोंद घेऊन आदेश देणे अपेक्षित आहे. तसेच लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अंतर्गत सातबारा नोंद ही अधिसूचित सेवा असून कमाल ४५ दिवसांच्या आत अंतिम आदेश देणे कायदेशीर बंधनकारक आहे. मात्र या प्रकरणात नियमांनी ठरवून दिलेला कालावधी ओलांडूनही कोणताही लेखी आदेश न दिल्याने प्रक्रियात्मक विलंबाबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत.सातबारा नोंद न झाल्यामुळे संबंधित नागरिकाला मालमत्ता व्यवहार, कर्ज, बांधकाम परवानगी यांसारख्या बाबींमध्ये अडथळे येत असल्याचे सांगण्यात येत आहे. या प्रकरणात संबंधित कार्यालयाकडून तातडीने निर्णय घेऊन नियमांनुसार कार्यवाही व्हावी, अशी अपेक्षा व्यक्त होत असून वरिष्ठ स्तरावरून लक्ष घातले जावे, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

## शेगाव - उमरखेड बसचा अपघात पाच जण किरकोळ जखमी!

●सिटी न्युज ब्युरो @ अनसिंग●

अनसिंगहून पुसद कडे जाणाऱ्या शेगाव उमरखेड बसला सापळी फाट्यावर अचानक दुचाकी स्वार रस्त्यात आडवा आल्यामुळे त्याचा बचाव करीत असताना बस रस्त्यावरून खाली उतरून पलटी झाली त्यामध्ये पाच जण किरकोळ जखमी झाल्याची घटना आज बुधवार(ता.११)रोजी दुपारी तीन वाजता च्या दरम्यान घटना घडली सुदैवाने जीवित हानी झाली नाही

अनसिंग वरून उमरखेड जात असताना दुचाकी स्वार अचानक रस्त्यात आडवा आल्याने त्याचा बचाव करण्याकरीता बसचालक संजय शिवदास धाये यांनी प्रयत्न करीत असताना बस पलटी होऊन अपघात घडला त्या बसमध्ये एकूण सदोतीस प्रवासी होते त्यामधील पाच जण किरकोळ जखमी



झाल्याची घटना घडली.त्या जखमीमध्ये यशोदा भिवाजी हनवते वय साठ वर्ष रा. अनसिंग, सीताबाई बाबुराव चव्हाण वय साठ वर्ष राहणार वसंतवाडी, श्यामराव देवजी चंदनशिव वय साठ वर्ष रा.अजनी ता. मेहकर, अहिल्या बळीराम चव्हाण वय ७९ रा.करजखेड ता. कन्नड जिल्हा संभाजीनगर. नितीन शेषराव जाधव वय ३२ वर्ष राहणार ब्राह्मणगाव ता. पुसद यांचा समावेश आहे .अनसिंग पोलिसांनी घटनास्थळाला भेट देऊन स्थानिकाच्या मदतीने प्रवाशांना सुखरूप बस बाहेर काढले व किरकोळ जखमींना ग्रामीण रुग्णालयांचे अनसिंग येथे प्राथमिक उपचारा करिता रवाना केले.

## उपकार्यकारी अभियंता कामचुकार, रिकाम्या खुर्चीला घातला हार!

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

जिल्ह्याची राजकीय राजधानी म्हणून ओळख असलेला रिसोड तालुका अलीकडच्या काळात अनेक समस्यांनी ग्रस्त झाला आहे. राज्याच्या राजकारणात प्रभाव टाकणारे अनेक दिग्गज नेते रिसोडच्या भूमीने दिले आहेत. मात्र या सर्वच नेत्यांचे आपल्या मातृभूमीकडेच दुर्लक्ष होत असल्याने तालुक्यातील सर्व सामान्य नागरिकांना आणि शेतकऱ्यांना विविध समस्यांचा सामना करावा लागत असल्याचे वास्तव समोर येत आहे. त्यातच महावितरणच्या गचाळ कारभाराने कळस गाठला असून सतत गैरहजर राहणाऱ्या उपकार्यकारी अभियंता यांच्या रिकाम्या खुर्चीला हार घालून युवक काँग्रेसने 'गांधीगिरी' व्यक्त केली आहे.



युवक काँग्रेसची 'गांधीगिरी'

तालुक्यातील वाकद उपकेंद्राअंतर्गत येत असलेल्या वाकद, महागाव, बाळखेड, गोहोगाव, एकलसपूर, वाडी वाकद आदी गावातील कृषी पंपाचा वीज पुरवठा गेल्या चारपाच दिवसांपासून बंद आहे. परिणामी शेतकऱ्यांना रब्बी पिकांच्या सिंचनाची पंचाईत झाली आहे. त्यामुळे गहू,हरभरा, कांदा, हळद आदी ओलितांची पिके सुकून जात असल्याने शेतकरी त्रस्त झाले असल्याची माहिती समोर येत आहे. याबाबत परिसरातील शेतकऱ्यांनी सबंधित कार्यालयात अनेक वेळा तक्रारी केल्या आहेत. मात्र कोणीही दखल घेतली नाही. ही गंभीर समस्या पंचायत समितीचे सदस्य राहिलेले तथा युवक काँग्रेसचे राहुल बोडखे यांना माहिती पडताच त्यांनी शेतकऱ्यांचे गाऱ्हाणे मांडण्यासाठी आपल्या कार्यकर्त्यांसह वितरणचे उपकार्यकारी अभियंता कार्यालय गाठले. पण गाऱ्हाणे एकूण घेण्यासाठी जबाबदार अधिकारीच अनुपस्थित असल्याने अखेर रिकाम्या खुर्चीला 'हार' घालून अनोखा निषेध व्यक्त केला. युवक काँग्रेसच्या हे 'गांधीगिरी' आंदोलन सद्यस्थितीत तालुक्यात चर्चेचा विषय बनले आहे. उपकार्यकारी अभियंता श्री राऊत यांच्या खुर्चीला हार घालून निषेध व्यक्त करत, कृषी पंपाचा वीज पुरवठा सुरळीत करा, महागाव, बाळखेड येथे कायमस्वरूपी लाईनमन द्या, नादुरुस्त असलेली अर्धवट कामे तात्काळ पूर्ण करा, वाकद उपकेंद्रावरून महागावसाठी मंजूर असलेली कृषी पंपाची वीज वाहनी तातडीने सुरू करा, धोडप बू. उपकेंद्रावरून भापूर, तांदूळवाडी ही नवीन वीज वाहनी त्वरित सुरू करा, वीज पुरवठा ही सर्व सामन्यांसाठी जीवनावश्यक सेवा असून, वीज वितरण विभागाने आपल्या गचाळ कारभारात सुधारणा करावी व उपरोक्त मागण्या तातडीने मार्गी लावाव्यात अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशाराही यावेळी युवक काँग्रेसकडून देण्यात आला आहे.

# भडकुंभा फाटा ते रामगड रस्त्यावर खड्ड्यांचे साम्राज्य!

### * प्रशासनाच्या बेजबाबदारपणामुळे नागरिक संतप्त *शितलताई राठोड यांचा आंदोलनाचा इशारा

●सिटी न्युज ब्युरो @ रिसोड●

**मंगरूळपीर तालुक्यातील भडकुंभा फाटा ते भडकुंभा रामगड या रस्त्याची अवस्था इतकी भीषण झाली आहे की हा रस्ता नसून जणू नागरिकांसाठी मृत्यूचा सापळा बनला आहे. रस्त्यावर मोठमोठे खड्डे, उघडी गिट्टी व प्रचंड धूळ यामुळे दररोज अपघात होत असून प्रशासन मात्र गाढ झोपेत असल्याचा आरोप संतप्त नागरिकांनी केला आहे.**



याबाबत समनक जनता पार्टीच्या महिला आघाडी जिल्हाध्यक्ष शितल राठोड यांनी जि. प. बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता यांना दि. ९ फेब्रुवारी रोजी रस्ता नूतनीकरणाच्या मागणीचे निवेदन सादर केले. दररोज शेकडो विद्यार्थी, शेतकरी, महिला, वृद्ध व रुग्ण या मार्गावरून जीव धोक्यात घालून प्रवास करत आहेत. दुचाकी घसरून पडणे, वाहने बंद पडणे, रुग्णवाहिकांना अडथळे येणे हे रोजचेच झाले आहे. तरीही संबंधित अधिकारी याकडे दुर्लक्ष करीत आहेत अशी टीका नागरिकांकडून होत आहे.धानोरा ते पोहरादेवी रस्त्यासाठी सुरू असलेल्या मुरूम वाहतुकीसाठी या मार्गाचा वापर करून संपूर्ण रस्ता उद्ध्वस्त करण्यात आला आहे. जड टिप्परच्या सततच्या वाहतुकीमुळे रस्त्याची चाळण झाली असून याला जबाबदार कोण? असा संतप्त सवाल जनतेकडून उपस्थित केला जात आहे.हा रस्ता मंगरुळपीर बाजारपेठ, तहसील, न्यायालय, शाळा तसेच ग्रामीण भागाला जोडणारा एकमेव मार्ग आहे. मात्र,प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे हा मार्ग आता संकटाचा मार्ग बनला आहे. कोट्यवधींचा निधी कुठे जातो? रस्ते दुरुस्तीसाठीचा पैसा कोणाच्या घशात जातो? असा थेट आरोप नागरिक करत आहेत. दरम्यान, समनक जनता पार्टीच्या जिल्हाध्यक्ष सौ. शितल विष्णू राठोड यांनी प्रशासनाला कडक शब्दांत इशारा दिला असून, १५ दिवसांत काम सुरू न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा ठाम निर्धार व्यक्त केला आहे.जनतेच्या जीवाशी खेळ करणाऱ्या अधिकाऱ्यांना धडा शिकविल्याशिवाय शांत बसणार नाही असा इशाराही त्यांनी दिला आहे.आता तरी प्रशासन जागे होणार का?की एखाद्या निष्पाप नागरिकाचा बळी गेल्यावरच हालचाल करणार असा रोषपूर्ण सवाल संपूर्ण परिसरात घुमत आहे.

## स्व-कर्तृत्व जनसेवेचं नेतृत्व

# दादाच्या कार्याचा 'ठसा'... ताईंचा जनसेवेचा 'वसा'!

कारंजा मतदार संघाच्या लोकप्रिय आमदार, जनतेच्या विश्वासावर उतरलेले नाव म्हणजे सईताई प्रकाशदादा डहाके. संघर्ष, चिकाटी आणि समाजप्रती असलेली निष्ठा या बळावर त्यांनी राजकारणाला केवळ सत्तेचे नव्हे, तर सेवेचे माध्यम बनवले आहे. त्या स्व. प्रकाशदादा डहाके यांच्या कार्याचा ठसा कायम ठेवून समाजसेवेचा वसा जपत आहेत. त्यांच्या वाढदिवसानिमित्त संपूर्ण कारंजा मतदार संघातून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

सईताई डहाके यांनी आपल्या कार्यकाळात ग्रामीण विकास, महिला सक्षमीकरण, शेतकरी प्रश्न, शिक्षण, आरोग्य व पायाभूत सुविधांवर ठोस काम करून जनतेचा विश्वास संपादन केला आहे. सर्वसामान्य नागरिक असो वा शेतकरी, युवक असो वा महिला-प्रत्येकाच्या अडचणी ऐकून घेऊन त्या सोडवण्यासाठी त्या सदैव तत्पर राहिल्या आहेत.विशेषतः महिलांसाठी स्वाभिमानाने जगण्याचा मार्ग खुला करणाऱ्या अनेक उपक्रमांत त्यांचा पुढाकार






### जनसेवेचा वसा जपणाऱ्या आ. सईताई डहाके

दिसून येतो. कारंजा मतदार संघातील रस्ते, पाणीपुरवठा, शाळा, आरोग्य केंद्रे यांसारख्या मूलभूत सुविधांसाठी त्यांनी सातत्याने पाठपुरावा केला. 'लोकप्रतिनिधी म्हणजे लोकांमध्येच राहणारा सेवक' ही भूमिका त्यांनी कृतीतून सिद्ध केली आहे.राजकारणात संयम, स्पष्ट भूमिका आणि जनतेशी थेट संवाद हे सईताई डहाके यांचे वैशिष्ट्य आहे. टीकेला उत्तर कामातून देण्याची त्यांची पद्धत आजच्या राजकारणात प्रेरणादायी ठरते. त्यामुळेच त्या केवळ आमदार म्हणून नव्हे, तर विश्वासार्ह नेतृत्त्व म्हणून ओळखल्या जातात.त्यांच्या वाढदिवसानिमित्त कारंजा मतदार संघातील नागरिक, कार्यकर्ते, महिला बचत गट, युवक व विविध सामाजिक संघटनांकडून त्यांना उदंड शुभेच्छा दिल्या जात आहेत.

ईश्वर त्यांना उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य आणि जनसेवेची अधिक ऊर्जा देवो, हीच सदिच्छा.आमदार सईताई प्रकाशदादा डहाके यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

**- किरण क्षार ,कारंजा**

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
गुरुवार, दि. १२ फेब्रुवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# दोन दिवसांपासून जागेअभावी तुरीची आवक बंद !



## कृउबासत लागले तुरीचे ढीग, भावातही झाली घसरण



### ९ हजारांवर गेलेली तूर आली ७-८ हजारांवर

जिल्ह्यातील बाजारात सध्या नवीन तुरीची आवक मोठ्या प्रमाणात वाढल्यामुळे भावातही जवळपास एक हजार रूपयांच्यावर घसरण झाली आहे. दहा दिवसांपूर्ण तुरीचे दर ९ हजार ५० रूपयांपर्यंत होते. सध्या हे दर सरासरी प्रतिक्विंटल ७ ते ८ हजार रुपयांपर्यंत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांची पुन्हा निराशा झाली आहे.

### हमीभावापेक्षा जास्त होते बाजारात तुरीचे दर

गत आठवड्यात तुरीचे भाव हमीभावापेक्षा जास्त असल्याने शेतकऱ्यांनी बाजार समितीतच तूर विक्रीसाठी आणली होती. आता तुरीची आवक वाढत असल्याने बाजार समितीत ११ फेब्रुवारीला सरासरी ८ हजारांचे दर होते. तर सरकारी केंद्रांवर तुरीची खरेदीवरही ८ हजार रूपये प्रतिक्विंटल दराने सुरु करण्यात आली आहे. त्यामुळे शासकीय तूर खरेदी केंद्राकडे शेतकरी आपला माल आणणार असल्याने तुरीची आवक वाढण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

तुरीची जास्त आवक होत आहे; मात्र होणारी तुरीची आवक ठेवण्यासाठी सध्या अकोला कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये जागा उपलब्ध नाही. त्यामुळे शेतकऱ्यांची गैरसोय होऊ नये, यासाठी दोन दिवस तुरीची आवक बंद राहणार आहे.

**शिरीष धोत्रे,**
कृउबास सभापती, अकोला

प्रतिनिधी १२फेब्रुवारी

**अकोला :** शेतकऱ्यांकडून विक्रीसाठी आणली जाणारी तूर ठेवण्यासाठी जागा उपलब्ध नसल्याने ११ त १२ फेब्रुवारी रोजी दोन दिवस अकोला कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये तुरीची आवक बंद ठेवण्यात आली आहे. त्यामुळे बाजार समितीच्या आवारात जागोजागी तुरीचे ढीग लागले आहेत. तसेच भावही दहा दिवसात हजार रूपयांपेक्षा अधिक घसरले आहेत. त्यामुळे पुन्हा शेतकरी वर्ग संकटात सापडला आहे.

सध्या तुरीचा हंगाम जोरात सुरू झाला आहे. तुरीचे भाव चांगले असल्याने शेतकऱ्यांनीही तूर काढणीसाठी लगबग चालविली होती. आता कृषी उत्पन्न बाजार समितीत तुरीची आवक मोठ्या प्रमाणात वाढली आहे. नवीन तूर विकण्यासाठी शेतक-यांकडून बाजारात आणली जात आहे. त्या अनुषंगाने जिल्ह्यातील बाजारात तुरीची आवक वाढली आहे; परंतु अकोला कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये माल ठेवण्यासाठी जागा उपलब्ध नसल्यामुळे ११ व १२ फेब्रुवारी रोजी या दोन दिवसांच्या कालावधीत बाजार समितीत तुरीची आवक थांबवण्यात आली आहे. सायंकाळी ७ वाजतानंतर तुरीची आवक स्वीकारली जाणार नसल्याचेही बाजार समिती प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे १२ फेब्रुवारीनंतरच समितीमध्ये तूर आणावी लागणार आहे. दरम्यान, तूर काढणी जोरात सुरू असल्याने शेतकऱ्यांनी ती बाजारात आणणे सुरू केले आहे. त्यामुळे एकाच वेळी गर्दी होत आहे. यामुळे शेतकऱ्यांच्या अडचणीत वाढ होताना दिसत आहे.

## एन.ए. प्रक्रियेला ब्रेक; बांधकाम मंजुरीतूनच जमिनीचे रुपांतरण

**अकोला :** राज्यातील जमीन रुपांतरण प्रक्रियेत मोठा बदल करत सरकारने अकृषक परवानगीची स्वतंत्र अट रद्द केली आहे. आता नगर रचना विभाग किंवा स्थानिक नियोजन प्राधिकरणाने मंजूर केलेला बांधकाम नकाशा हाच एन.ए. परवानगी म्हणून ग्राह्य धरला जाणार आहे. त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांकडून स्वतंत्र अकृषक सनद घेण्याची गरज संपुष्टात आली आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी महाराष्ट्र जमीन महसूल संहितेत सुधारणा करत हा निर्णय जाहीर केला. संबंधित दरवर्षीचा अकृषक कर रद्द करून त्याऐवजी जमिनीच्या बाजारमूल्यानुसार एकदाच 'रुपांतरण अधिमूल्य' आकारले जाणार आहे. १००० चौ. मी. पर्यंत ०.१० टक्के, १००१ ते ४००० चौ. मी. पर्यंत ०.२५ टक्के आणि त्यापेक्षा जास्त क्षेत्रफळासाठी ०.५० टक्के दर निश्चित करण्यात आले आहेत.

## महापौरांच्या प्रभागात स्वच्छता, नाल्यांचे कामही सुरू !



आर आर सी इम्पॅक्ट...

प्रतिनिधी १२फेब्रुवारी

**अकोला:** महापौरांच्या प्रभागातच नागरी समस्या मोठ्या प्रमाणात असतील अन्य प्रभागाचे काय अशी विचारणा होत होती. परंतु आता प्रभागातील स्वच्छता तसेच नाल्याचे बांधकाम करण्यात येत आहे. हा विषय आर आर सी नेटवर्क ने लावून धरला होता. त्याचा योग्य परिणाम दिसून येत आहे.

शहराच्या प्रथम नागरिक म्हणून मान असलेल्या महापौरांच्या प्रभागात स्वच्छता राहावी, नाल्यांची सफाई व्हावी तसेच नागरी सोयी सुविधा उपलब्ध व्हावी ही किमान अपेक्षा असते. परंतु समस्या मोठ्या प्रमाणात असतील तर चर्चा होणे स्वाभाविक आहे. काही दिवसांपूर्वी प्रभाग क्रमांक १५ मध्ये विविध समस्या दिसून आल्या. त्याचा चांगला परिणाम झालेला दिसतो. प्रभागातील प्रलंबित कामांना आता सुरूवात झालेली दिसते. केवळ एका प्रभागापुरता विकास मर्यादित न राहता संपूर्ण शहराचा विचार व्हावा ही जनभावना आहे.

## शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबियांची अडचण सोडवून योजनांचा लाभ मिळवून देणार – जिल्हाधिकारी मीना

प्रतिनिधी १२फेब्रुवारी

**अकोला :** शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबांशी सातत्याने संवाद ठेवून त्यांची प्रत्येक अडचण सोडविण्यात येईल, तसेच त्यांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यात येईल, अशी ग्वाही जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी बुधवारी दिली.

जिल्ह्यात गत दोन वर्षातील सुमारे पावणेदोनशे शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबांना विविध योजनांची माहिती व लाभ मिळवून देण्यासाठी जिल्हाधिकारी वर्षा मीना यांच्या संकल्पनेतून संवाद कार्यक्रमाचे आयोजन नियोजन भवनात करण्यात आले. यावेळी



जिल्हाधिकारी यांनी या कुटुंबांशी संवाद साधून अडचणी जाणून घेतल्या. अडचणी तत्काळ सोडवून, त्यांना विविध योजनांचा लाभ मिळवून देण्याचे निर्देश यंत्रणांना दिले.

जिल्हाधिकारी मीना म्हणाल्या, कुटुंबातील व्यक्ती गेल्याची भरपाई कशातूनही होत नाही. मात्र, अशा कुटुंबांच्या अडचणी सोडवून त्यांना विविध योजनांचा लाभ देऊन दिलासा देण्याचा प्रशासनाचा प्रयत्न आहे. सर्व अडचणींचे निराकरण पुढील १० दिवसांत करण्याचे निर्देश जिल्हाधिका-यांनी दिले.

निवासी उपजिल्हाधिकारी गजेंद्र मालठाणे यांनी उपक्रमाची माहिती दिली. तहसीलदार गौरी धायगुडे यांनी संजय गांधी योजना, श्रावण बाळ योजना, तर जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी हरीश देशमुख यांनी कृषी योजनांची माहिती दिली. सहाय्यक आयुक्त गोपाळ वाघमारे यांनी समाजकल्याण योजना, जिल्हा रेशीम विकास अधिकारी सुनीलदत्त फडके यांनी रेशीम विकास योजनांची माहिती दिली. पशुसंवर्धन उपायुक्त स्नेहल पाटील, जिल्हा अग्रणी बँकेतर्फे गोरे, जिल्हा उपनिबंधक कार्यालयातर्फे मनवर, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतर्फे रविंद्र थोरात, आयटीआयतर्फे कोलते, आरोग्य विभागातर्फे वृषाली बोबडे, इंगोले यांनी योजनांची माहिती दिली.

## शिवणी ते मलकापूर मार्गावर भंगार बसला लागली आग!

प्रतिनिधी १२फेब्रुवारी

**अकोला:** शिवणी ते मलकापूर दरम्यान महामार्गावर एका भंगार बसला क्रेनच्या सहाय्याने नेले जात असताना भीषण आग लागली. बसचे टायर अतिउष्ण झाल्याने ही आग लागल्याचे समोर आले आहे. या घटनेमुळे महामार्गावर काही काळ खळबळ उडाली होती. अकोला शहराजवळील नॅशनल हायवेवर शिवणी ते मलकापूर दरम्यान आज बुधवारी दुपारी साडेतीनच्या सुमारास एका भंगार बसला अचानक आग लागली. ही भंगार बस क्रेनच्या सहाय्याने ओढून नेली जात असताना, घर्षणामुळे बसचे टायर प्रचंड तापले आणि त्यांनी पेट घेतला. या घटनेमुळे हायवे वरील वाहतूक काही काळ ठप्प झाली होती, तर वाटसरू आणि इतर वाहनचालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होऊन पळापळ झाली.

## १६१ पोलीस कर्मचाऱ्यांची भरती प्रक्रिया सुरू

### शारीरिक चाचणीनंतर उमेदवारांना लेखी परीक्षा द्यावी लागेल





प्रतिनिधी १२फेब्रुवारी

**अकोला:**पोलीस दलातील १६१ पदांच्या भरतीसाठी बुधवार, ११ फेब्रुवारीपासून शहरातील पोलीस मुख्यालयात मैदानी चाचणीला सुरुवात झाली आहे. या भरती प्रक्रियेत एकूण ११,७८४ उमेदवार सहभागी होत असून, त्यामध्ये तरुणींचाही समावेश आहे.

भरती प्रक्रिया पारदर्शक, निष्पक्ष आणि सुव्यवस्थित पार पाडण्यासाठी पोलीस मुख्यालय परिसरात कडक सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आली आहे. पोलीस प्रशासनाने मुख्यालय आणि आसपासच्या परिसरात चोख बंदोबस्त ठेवला आहे. कायदा व सुव्यवस्था राखण्यासोबतच उमेदवारांची सोय आणि सुरक्षिततेकडेही विशेष लक्ष दिले जात आहे.

पोलीस अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे की, संपूर्ण भरती प्रक्रिया पारदर्शक पद्धतीने पार पडेल आणि कोणत्याही प्रकारची अनियमितता खपवून घेतली जाणार नाही. बुधवारी सकाळी ८ वाजेपासून सर्वप्रथम उमेदवारांच्या अर्जांची छाननी करण्यात आली. त्यानंतर शारीरिक चाचणी घेण्यात आली, ज्यामध्ये धावणे, गोळाफेक, लांब उडी आणि शारीरिक मोजमापांचा समावेश होता.

शारीरिक चाचणीत यशस्वी होणाऱ्या उमेदवारांना पुढे लेखी परीक्षा द्यावी लागणार आहे. सर्व टप्प्यांत पात्र ठरलेल्या उमेदवारांना अंतिम निवडीपूर्वी वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य असेल.

बाहेरून येणाऱ्या उमेदवारांची गैरसोय होऊ नये म्हणून पोलीस प्रशासनातर्फे निमवाडी परिसर येथील पोलीस हॉलमध्ये राहण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. भरती प्रक्रियेबाबत तरुणांमध्ये मोठा उत्साह दिसून येत आहे.

## पुरवठा निरीक्षकावर प्राणघातक हल्ला
## अकोला तहसील कार्यालयातील घटना

प्रतिनिधी १२फेब्रुवारी

**अकोला:** तहसील कार्यालयातील पुरवठा विभागात कार्यरत पुरवठा निरीक्षक विश्वजित लिंगायत यांच्यावर बुधवारी एका व्यक्तीने शासकीय कार्यालयात घुसून हल्ला करण्याचा प्रयत्न केला. या हल्ल्यामध्ये पुरवठा निरीक्षक विश्वजित लिंगायत हे किरकोळ जखमी झाले असल्याची माहिती मिळाली



आहे. पुरवठा निरीक्षक विश्वजित लिंगायत यांच्या कक्षामध्ये आज एक व्यक्ती हे राशन कार्ड मधील नाव कमी करण्यासाठी आले होते, परंतु पुरवठा निरीक्षक यांनी राशन कार्डधारक लाभार्थीला उपस्थित करण्यासंदर्भात सांगितले असता सदर व्यक्तीने कार्यालयात पुरवठा निरीक्षक यांना शिवीगाळ करीत त्यांच्यावर हल्ला करण्याचा प्रयत्न केला. या घटनेमध्ये विश्वजित लिंगायत यांच्या हाताला व छातीला दुखापत झाल्याचे त्यांनी दिवशी बोलताना सांगितले. गुडधी येथील गजानन सुरवाडे यांच्यावर त्यांनी आरोप केला आहे. तपास सिटी कोतवाली पोलिस करीत आहे.

## अकोला जन्मभूमी अन् नागपूर कर्मभूमी असलेल्या सद्गुरूदास महाराजांवर आज अंत्यसंस्कार

प्रतिनिधी १२फेब्रुवारी

**अकोला :** गुरू मंदिर परिवाराचे आधारस्थान 'धर्मभास्कर' सद्गुरुदास महाराज अर्थात प्रसिद्ध शिवकथाकार विजयराव देशमुख यांचे बुधवारी हृदयविकाराने निधन झाले. ते ८४ वर्षांचे होते. 'शककर्ते शिवराय' या शिवचरित्रग्रंथाद्वारे छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार आणि कार्य जनमानसापर्यंत पोहोचविण्याचे मोलाचे कार्य त्यांनी केले. त्यांची जन्मभूमी अकोला जिल्ह्याच्या तेल्हारा तालुक्यातील गाडेगाव तर कर्मभूमी नागपूर होती. त्यांच्यावर आज गुरूवारी नागपूर येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार असून, जिल्ह्यातील मोठा जनसमुदाय अंत्यसंस्काराला नागपूर येथे गेला आहे.

सद्गुरूदास महाराजांवर मागील काही दिवसांपासून नागपूर येथील विवेका हॉस्पिटल येथे उपचार सुरू होते. बुधवारी सायंकाळी त्यांनी रुग्णालयातच अखेरचा श्वास घेतला. त्यांचे पार्थिव जयप्रकाशनगर येथील त्यांच्या निवासस्थानी अनुयायांच्या दर्शनासाठी ठेवण्यात आले असून दुपारी तीन वाजता सहकारनगर घाट येथे अंत्यसंस्कार करण्यात येतील. त्यांच्या पश्चात मुलगा अजय; तसेच नीता काटेकर, प्रज्ञा फडणीस, वर्षा वेलंकीवार या तीन मुली व नातवंडे आणि मोठा भक्तपरिवार आहे.

### सद्गुरूदास महाराजांचा अल्प परिचय?



सद्गुरूदास महाराज यांचा जन्म २८ जानेवारी १९४२ रोजी अकोला जिल्ह्यातील गाडेगाव येथे शेतकरी कुटुंबात झाला. त्यांचे शिक्षणही तेल्हारा तालुक्यातच झाले. १९ व्या वर्षापासून त्यांनी शिवकार्याला प्रारंभ केला. १२ जानेवारी १५९८ ही जिजाऊंची जन्मतारीख असल्याचे त्यांनी संशोधनाअंती सांगितले. तसेच त्यांच्याच संशोधनाद्वारे छत्रपती शिवाजी महाराजांची १९ फेब्रुवारी १६३० ही जन्मतारीख निश्चित केली आणि शासनाने ती स्वीकारली. यासाठी देशमुख यांनी अथक परिश्रम घेतले.







CLASSIFIED

कंपनी काम के लिय
अनुभवी सेल्समन चाहिये
-:संपर्क :-
सियाराम मार्केटिंग
होमअप्लांर्स गिफ्ट आर्टिकल
चित्रा टॉकीज के पास अमरावती
हमारे यह शादी, बर्थडे एवम सभी प्रसंग के लिय ठोक भाव रिटन गिफ्ट मिलते है!
9422956859
9422733033
9657901854







हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ▪ संपर्क – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012/49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK CMYK